❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

भारतावर १०० टक्के टॅरिफचं संकट?

नवी दिल्ली : दैनिक संध्या

अमेरिकेचे भारतातील उच्चायुक्त सर्जियो गोर यांनी एका महत्त्वाच्या मुद्यावर भाष्य केलं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 18 सप्टेंबरला लिंडसे ओ ग्राम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट ऑफ 2026 वर स्वाक्षरी करत त्याचं कायद्यात रुपांतर केलं होतं. त्या कायद्यानुसार रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या प्रमुख देशांवर 100 टक्के टॅरिफ लावण्याची तरतूद आहे. ब्लूमबर्ग न्यू इकोनॉमी फोरममध्ये बोलताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुढील 10 दिवसांमध्ये निर्बंधांबाबत निर्णय घेऊ शकतात, असं सर्जियो गोर यांनी म्हटलं. भारत देखील रशियाकडून क्रूड ऑईल आणि गॅसची खरेदी करतो, त्यामुळं ट्रम्प यांच्या निर्णयाचा भारतावर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे. ब्लूमबर्ग न्यू इकोनॉमी फोरममध्ये बोलताना सर्जियो गोर म्हणाले की ट्रम्प यांच्याकडून पुढील 10 दिवसात कोणतातरी निर्णय घेतला जाईल. ते म्हणाले ट्रम्प यांनी आतापर्यंत 18 सप्टेंबरला मंजूर झालेल्या कायद्यानुसार कोणत्याही देशावर निर्बंध घातलेले नाहीत. नियमानुसार त्यांना कायदा मंजूर झाल्यानंतर 30 दिवसात निर्णय घेणं आवश्यक होतं.

फोनच्या स्क्रीनवर नाव दाखवणे गरजेचे

नवी दिल्ली : दैनिक संध्या

तुमच्या फोनवर जेव्हा कोणाचाही कॉल येईल, तेव्हा स्क्रीनवर त्या व्यक्तीचा नंबर आणि नाव दोन्ही दिसतील. दूरसंचार विभागाने टेलिकॉम ऑपरेटर्सना 1 नोव्हेंबर 2026 पासून ही सेवा सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. वापरकर्त्याला ही सेवा स्वतंत्रपणे सक्रिय करण्याची गरज भासणार नाही. सरकारने कंपन्यांना निर्देश दिले आहेत की 1 नोव्हेंबर 2026 पासून सर्व 4G आणि 5G मोबाइल नेटवर्कवर 'कॉलिंग नेम प्रेझेंटेशन' (CNAP) अनिवार्य करण्यात यावे. यामुळे कोणत्याही अनोळखी नंबरवरून कॉल आल्यास कॉल करणाऱ्या व्यक्तीचा नंबर आणि नाव फोनच्या स्क्रीनवर दिसेल. स्क्रीनवरील पहिल्या फील्डमध्ये कॉल करणाऱ्याचा नंबर दिसेल. दुसऱ्या फील्डमध्ये तो नंबर कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये सेव्ह केलेला असल्यास तेच नाव दिसेल. मात्र नंबर सेव्ह केलेला नसेल, तर सिम घेताना वापरकर्त्याने टेलिकॉम कंपनीच्या रेकॉर्डमध्ये नोंदवलेले नाव दिसेल. कॉल दुसऱ्या देशातून म्हणजेच इंटरनॅशनल नंबरवरून येत असल्यास, स्क्रीनवर कोणाचेही नाव न दिसता फक्त "इंटरनॅशनल कॉल" असे लिहिलेले दिसेल. होय, प्रत्येक दूरसंचार सेवा प्रदात्याला आपल्या वापरकर्त्यांची नावे आणि त्यांचे मोबाइल क्रमांक लिंक करणारा नवीन डेटाबेस तयार करावा लागेल. तुम्हाला कॉल आल्यावर कंपनी डेटाबेसमधून नाव मिळवून ते त्वरित तुमच्या स्क्रीनवर दाखवेल. कॉल संपताच प्रणाली ते नाव आपल्या मेमरीमधून त्वरित हटवेल, जेणेकरून तुमचा डेटा पूर्णपणे सुरक्षित राहील. तसेच, ज्या लोकांनी गोपनीयतेसाठी आपले नाव लपवण्याची सेवा घेतली आहे.

महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात

महायुती सरकारला नोटीस

■ महायुती सरकारला नोटीस, ३० नोव्हेंबरला पुढील सुनावणी

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावरून आता कायदेशीर संघर्ष सुरू झाला आहे. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. त्यामुळे राज्यातील रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्याच्या निर्णयाची घटनात्मक वैधता पुन्हा चर्चेत आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी 30 नोव्हेंबर 2026 रोजी होणार आहे.

राज्य सरकारने 1 मे 2026 पासून रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेची अट लागू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयामुळे चालकांच्या व्यवसायावर, परवाना व्यवस्थेवर



आणि मूलभूत हक्कांवर परिणाम होऊ शकतो, असा दावा करत त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने ही बाब विचारात घेत याचिका फेटाळली होती. त्यानंतर संबंधित निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. आता सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची बाजू जाणून घेण्याचा निर्णय घेतल्याने या प्रकरणातील पुढील घडामोडींकडे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालवणाऱ्या चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असावे, या उद्देशाने राज्य सरकारने मराठी भाषा अनिवार्य करण्याची भूमिका घेतली. प्रवाशांशी संवाद साधताना स्थानिक भाषेचा वापर करता यावा आणि चालकांना मराठीतून व्यवहार करता यावेत, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे मानले जाते.

या निर्णयानुसार चालकांना मराठी बोलता येणे आवश्यक असल्याची अट घालण्यात आली. संबंधित नियमांचे पालन न केल्यास वाहन चालविण्याचा परवाना किंवा लायसन्स रद्द करण्यासारखी कारवाई होऊ शकते, असा मुद्दाही या प्रकरणात उपस्थित करण्यात आला आहे.

चालकांच्या मूलभूत हक्कांचा मुद्दा उपस्थित

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. विवेक शुक्ला आणि ॲड. संजय पारिख यांनी बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादानुसार, राज्य सरकारच्या अधिसूचनेमुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर परिणाम होऊ शकतो. तसेच, ही अधिसूचना संविधानातील तरतुदींशी आणि मोटार वाहन कायद्यातील नियमांशी सुसंगत आहे का, याची तपासणी होणे आवश्यक आहे. रिक्षा आणि टॅक्सी चालविणे हा अनेकांसाठी उदरनिर्वाहाचा प्रमुख मार्ग आहे. अशा परिस्थितीत भाषेच्या अटीचे पालन न केल्यामुळे परवाना रद्द करण्यासारखी कारवाई होणार असल्यास त्याचा थेट परिणाम चालकांच्या रोजगारावर होऊ शकतो, असा मुद्दा या प्रकरणात महत्त्वाचा ठरतो. याचिकाकर्त्यांच्या मते, या अधिसूचनेचा परिणाम केवळ एका चालकापुरता मर्यादित राहणार नाही. राज्यातील मोठ्या संख्येने रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या व्यवसायाशी हा प्रश्न संबंधित आहे. त्यामुळे या नियमाची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्यामागील कायदेशीर अधिकार आणि घटनात्मक मर्यादा तपासणे गरजेचे आहे.

तुकाराम मुंढेंची नजर मसाला भेसळीवर

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाच्या माध्यमातून 'सेफ फूड, सेफ ड्रग्स' अभियान आक्रमकपणे राबवणारे डॅशिंग अधिकारी आणि एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची नजर आता मसाले आणि मसाल्याच्या पदार्थांतील भेसळीकडे वळली आहे. दूध आणि डेअरी उत्पादकांनंतर आता तुकाराम मुंढे यांनी मसाला उत्पादक, विक्रेते आणि हॉटेल व्यावसायिकांसाठी कडक आदेश जारी केले आहेत. या आदेशांनुसार, मसाल्यांमध्ये भेसळ करणे, कृत्रिम रंगांचा वापर करणे किंवा पॅकेटवर खोटे आणि दिशाभूल करणारे दावे करणे यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मकोका सारखी कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. एफडीएने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार हळद, तिखट, मिरची, दालचिनी, काळीमिरी, खसखस यासह सर्वच प्रमुख मसाले आणि मसाल्यांच्या पदार्थांवर खालील कडक नियम लागू करण्यात आले आहेत, बाजारात सुट्ट्या मसाल्यांची विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. केवळ वैध अन्न परवाना असलेल्यांनाच मसाले विक्री करता येईल. मसाल्यांमध्ये आकर्षक दिसण्यासाठी वापरले जाणारे कृत्रिम रंग, औद्योगिक रंग किंवा अर्क काढलेल्या निकृष्ट दर्जाच्या मसाल्यांची भेसळ करण्यास सक्त मनाई आहे.

रिलायन्स जिओची 6G कडे वाटचाल, नेटवर्कमध्ये सॉफ्टवेअर अपग्रेडवर भर देणार

आकाश अंबानी यांनी जिओचं मिशन मांडलं

■ मुंबई (दै. संध्या)

जिओ प्लॅटफॉर्म्स लिमिटेडच्या प्रस्तावित आयपीओ संदर्भात आकाश अंबानी, ईशा अंबानी यांनी पत्रकार परिषद घेतली. जिओ कंपनीच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भात आकाश अंबानी यांनी महत्त्वाची माहिती दिली. रिलायन्स जिओची 6G कडे वाटचाल सुरु असल्याचं आकाश अंबानी म्हणाले. जिओचा आयपीओ रिटेल गुंतवणूकदारांसाठी 21 ऑक्टोबरला खुला होईल, त्यानंतर 23 ऑक्टोबरपर्यंत सबस्क्रीप्शन करता येईल. आकाश अंबानी यांनी जिओचा 6G साठी नव्या पायाभूत सुविधांऐवजी सॉफ्टवेअर अपग्रेडवर भर असल्याचं सांगितलं. तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे जिओचे पहिले मिशन हेच असल्याचं ते म्हणाले. भारतीयांना तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून देण्यावर जिओचा भर असून 6G तंत्रज्ञान सॉफ्टवेअर अपग्रेडच्या माध्यमातून लागू करण्याची जिओची संकल्पना असल्याची माहिती आकाश अंबानी यांनी दिली. जिओ नव्या इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी करण्याऐवजी विद्यमान नेटवर्कमध्ये सॉफ्टवेअर अपग्रेडवर भर देणार आहे. 6G तंत्रज्ञानाच्या दिशेने जिओचे मोठे पाऊल टाकल्याचं वक्तव्य रिलायन्स जिओ इन्फोकॉमचे चेअरमन आकाश अंबानी यांनी केलं आहे. रिलायन्स जिओच्या आयपीओ लाँचिंगच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उद्योजक उदय कोटक यांनी



जवळपास दोन दशकांनंतर रिलायन्स समूहाचा ऐतिहासिक IPO येत असल्याचे म्हटलं. जिओचा आयपीओ हा ऐतिहासिक टप्पा असल्याचं कोटक म्हणाले. धीरूभाई अंबानी यांनी सर्वसामान्य गुंतवणूकदारांना शेअर बाजाराशी जोडण्याचे महत्त्व ओळखले असंही कोटक यांनी म्हटलं. गेल्या १० वर्षांत भारत डेटा-अभावी देशाकडून डेटा-समृद्ध देशाकडे पोहोचला आहे, असंही ते म्हणाले. उदय कोटक यांनी वयाच्या १८व्या वर्षी मुंबईचा मरीन ड्राइव्ह रिलायन्सच्या IPO च्या जाहिरातीसाठी उजळलेला पाहिल्याची आठवण सांगितली. आकाश अंबानी आणि ईशा अंबानी यांच्या नेतृत्वाखाली नव्या डिजिटल व्यवसायांची उभारणी होत असल्याबाबत कोटक यांनी त्यांचं कौतुक केलं. जिओच्या आयपीओ लॉटमधील एका शेअरसाठी किंमतपट्टा 1065 ते 1119 रुपये निश्चित करण्यात आला आहे. या आयपीओच्या माध्यमातून जिओचे 27 कोटी शेअर नव्यानं जारी केले जाणार आहेत. उच्च किंमतपट्टा ग्राह्य धरल्यास जिओचा आयपीओ 30213 कोटी रुपयांचा असेल. हा भारतातील सर्वात मोठा आयपीओ ठरु शकतो. एका शेअरचं दर्शनी मूल्य 10 रुपये निश्चित करण्यात आलं आहे. आयपीओ सबस्क्राइब करण्यासाठी 21 ऑक्टोबरपासून खुला असेल तर सबस्क्रीप्शन 23 ऑक्टोबरला बंद होईल. अँकर इन्वेस्टर्स 19 ऑक्टोबरपासून बोली लावू शकतात.

दिवाळीत रस्त्यांवर फटाके फोडण्यास 'सुप्रीम' ब्रेक

मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा आदेश; DJ आणि लेझर लाईट्सवरही निर्बंध

■ मुंबई (दै. संध्या)

आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर आणि सण-उत्सवांच्या काळात होणारे वायू आणि ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय दिला आहे. दिवाळीसह वर्षभरातील सर्वच सणांदरम्यान सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके फोडण्यावर पूर्णपणे बंदी घालण्याचे कडक आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि प्रशासनाला दिले आहेत. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने सुमोटो याचिका आणि इतर याचिकांवर सुनावणी करताना हे महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. विषारी प्रदूषणामुळे लहान मुले आणि ज्येष्ठांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो, त्यामुळे आता काळ बदलला असून हे चित्र बदलणे गरजेचे आहे, अशी कडक टिप्पणी न्यायालयाने केली आहे. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, फटाक्यांच्या निर्मिती आणि विक्रीवर कोणतीही बंदी घालण्यात आलेली नाही. मात्र, सार्वजनिक ठिकाणी ते फोडण्यास सक्त मनाई असेल. यासोबतच सण-उत्सवांच्या काळात धुमाकूळ घालणाऱ्या डीजे (DJ), डॉल्बी, लाऊडस्पीकर आणि डोळ्यांना इजा पोहोचवणाऱ्या लेझर लाईट्सच्या वापरावरही कडक निर्बंध लादण्यात आले आहेत.

न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, 22 सप्टेंबर 2026 रोजी गणेशोत्सवादरम्यान देण्यात आलेले हे निर्देश केवळ यंदाच्या दिवाळीपुरते मर्यादित नसून, वर्षभरातील सर्वच धर्मांच्या सण-उत्सवांसाठी कायमस्वरूपी लागू राहतील. नागरिकांच्या आरोग्याच्या अधिकारांना प्राधान्य असून कायद्याचे पालन करून घेणे ही राज्य सरकार, पोलीस आणि महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असल्याचे न्यायालयाने बजावले आहे.



आठवड्यात नियमावली तयार करण्याचे आदेश

- मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला संयुक्तपणे पुढील आठवड्यात जनजागृती नियमावली तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.
- वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, सोशल मीडिया आणि शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून हरित फटाक्यांच्या वापराबाबत व्यापक जनजागृती करण्यात यावी.
- जनजागृती मोहिमेसाठी गरज पडल्यास दिग्गज सेलिब्रिटींची मदत घेण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत.
- बस, लोकल ट्रेन्स आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करणारे माहिती फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शिवसेनेत प्रवेश केल्याचं नाकारलं

एकनाथ शिंदेंचं शिवसैनिकालाही लाजवेल इतकं कौतुक केलं, युनुस शेख नक्की कोणत्या पक्षात?

■ मुंबई (दै. संध्या)

ठाणे महानगरपालिकेतील एमआयएम पक्षाच्या नगरसेविका सहर शेख यांचे वडील युनुस शेख यांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्याची जोरदार चर्चा सध्या ठाण्यातील राजकीय वर्तुळात रंगली आहे. युनुस शेख हे एमआयएम (MIM) पक्षाचे आहेत. तरीही त्यांनी एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांच्या कट्टर हिंदुत्ववादी पक्षात प्रवेश कसा केला, याचीच चर्चा रंगली आहे. युनुस शेख यांनी आपण शिंदे सेनेशी संलग्न असलेल्या संघटनेचे पद स्वीकारले असले तरी मी अजूनही एमआयएम पक्षाचेच काम करत असल्याचा दावा केला आहे. त्यांचा हा दावा पचायला जड असला तरी युनुस शेख हे वारंवार आपण शिंदे सेनेत गेलोच नसल्याचे सांगत आहेत. मात्र, हे सांगताना युनुस शेख यांनी एखाद्या कट्टर शिवसैनिकाप्रमाणे एकनाथ शिंदे यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला आहे.

मी अजूनही एमआयएमचं काम करत आहे. माझा केबलचा इंटरनेटचा व्यवसाय आहे. त्यामुळे शिंदे साहेबांनी केबल सेनेत मला पद दिले आहे. आता शिंदे साहेबांनी दिलेली जबाबदारी मी पार



पाडणार आहे. मी शिवसेनेत प्रवेश केलेला नाही. ज्या अखिल भारतीय केबल संघटनेचे पद मला मिळाले आहे ती केबल ऑपरेटरर्सची संघटना आहे. मी या संघटनेचा कळवा-मुंब्रा परिसराचा अध्यक्ष आहे. मला शिवसेनेत प्रवेश करायचा असता तर मी नियुक्तीपत्र थेट एकनाथ शिंदे यांच्याच हातून घेतले असते. शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वामुळे वाढतेय, त्यांना आमची गरज नाही, असे युनुस शेख यांनी म्हटले.

एकनाथ शिंदे साहेब हे सर्वांचेच बॉस आहेत, आमचेही बॉस आहेत. मी शिंदे साहेबांची भेटही घेईन. त्यांच्या आशीर्वाद तर आहेच. त्यांनी आणखी कोणती नवी जबाबदारी दिली तर बघू. एकनाथ शिंदे साहेबांसोबत गेलं तर फायदाच आहे. त्यांचा पक्ष हिंदुत्ववादी आहे, पण त्या माणसासोबत गेलात तर फायदाच आहे. आमच्या वडिलांचे आणि एकनाथ शिंदे यांचे 40 वर्षांपासून संबंध आहेत. आमच्यावर संकट आलं तेव्हा एकनाथ शिंदे आणि असदुद्दीन ओवेसी हे दोघे आमच्या पाठिशी उभे राहिले. आम्हाला कोणाची भीती नाही, आम्ही एमआयएममध्ये आहोत, असे युनुस शेख यांनी म्हटले. केबल व्यावसायिकांसाठी आमची एमआयएमची कुठलीही संघटना नाही, केबल आणि इंटरनेट हा माझा गेल्या 40 वर्षांपासून व्यवसाय आहे. त्यामुळे कुठल्या ना कुठल्या संघटनेशी मला जुळायचं होतं म्हणून मी एकनाथ शिंदे यांच्या संघटनेशी जोडला गेलो. मी आधीपासून या संघटनेशी जुळलेलो होतो. मात्र, आज मला पद देण्यात आले आहे आणि ती जबाबदारी मी पार पाडेल. शिवसेनेचं नियुक्तीपत्र जरी असले आणि जर मला शिवसेनेचे चिन्ह असलेला गमछा घातला तर याचा अर्थ असा होत नाही की, मी पक्षप्रवेश केला आणि जर मला पक्षप्रवेश करायचा असेल तर मला कोणतही बंधन नाही, तो मी कधीही करू शकतो. शिवसेनेशी संबंध ठेवण्याचं कारण म्हणजे माझे वडील आणि माझे, एकनाथ शिंदे यांच्याशी चांगले संबंध आहेत. एकनाथ शिंदे त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांना आणि त्यांच्या परिवारांना कधीच विसरत नाहीत. जेव्हा कधीही आमच्यावर संकट येतं तेव्हा ते आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत होते आणि आत्ताही राहतात, मी जर त्यांना सांगितलं तर याहून मोठं पद घेऊ शकतो. पण असे काहीही नाही, असे युनुस शेख यांनी सांगितले.

माझ्याशी अधिकृत पत्रव्यवहार झाला नाही पण चर्चा झाली : तुकाराम मुंढे

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र सरकारनं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील पेपरफुटी आणि गैरप्रकारासंदर्भात एक चौकशी समिती स्थापन केली आहे. या समितीच्या सचिव पदावर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करणार असल्याचं राज्य सरकारच्यावतीनं पुण्यातील स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावेळी सांगण्यात आलं होतं. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी तुकाराम मुंढे यांना एमपीएससीच्या चौकशी समितीसंदर्भात विचारण्यात आलं. यावर तुकाराम मुढे यांनी त्यांच्यासोबत अधिकृत पत्रव्यवहार झालेला नाही, मात्र चर्चा झाल्याची माहिती पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना दिली. एमपीएससी संदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना तुकाराम मुंढे यांनी माझ्यासोबत कोणतंही कम्युनिकेशन झालं नसल्याचं म्हटलं. माझ्याकडे कोणतंही अधिकृत नोटिफिकेशन नाही, पण याच्याबाबत निश्चितच आमची चर्चा झाली आहे. काही कम्युनिकेशन तोंडी झालेलं आहे मात्र जोपर्यंत अधिकृत कम्युनिकेशन होत नाही तोपर्यंत त्याच्यावर बोलणं योग्य नाही, असं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं. मी स्पष्टपणे सांगितलं की



अधिकृत कम्युनिकेशन, नोटिफिकेशन आलेलं नाही. माझी काही बाबतीच चर्चा झालेली आहे. कोणाबरोबर चर्चा झाली हे उघड करणं योग्य नाही, असंही तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं. एमपीएससीनं जुनी कागदपत्रं रद्दी करुन ती नष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. आमदार रोहित पवार यांनी त्या निर्णयावर टीका करताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात तुकाराम मुंढे यांना प्रश्न विचारातच त्यांनी हा प्रश्न एमपीएससीला विचारण्याची आवश्यकता असल्याचं म्हटलं. या प्रश्नाबाबत तुकाराम मुंढे यांनी त्यांच्याकडे कोणतीही माहिती नसल्याचं आणि त्यांची अथॉरिटी नसल्याचं स्पष्ट केलं.

संपादकीय

संवाद आणि निर्मळपणाची आवश्यकता

ज्या देशात लोकशाहीचा अवलंब केलेला आहे. त्या लोकशाहीच्या न्यायदेवतेच्या मंदिरात सर्वसामान्य नागरिक आणि शासन यांच्यातील नाते विश्वासाच्या. प्रामाणिकपणाच्या. धाग्यावर विणलेले जाते. जेव्हा या लोकशाहीच्या मंदिरामध्ये एकमेकांच्या मध्ये असणाऱ्या विश्वासाला तडा जातो. व त्यानंतर निर्माण होणारा खदखदता असंतोष केवळ राजकीय वातावरणापुरता किंवा विषयापुरता मर्यादित राहत नाही. तर तो संपूर्ण सरकारच्या प्रणालीच्या पारदर्शकतेवर आणि त्याच्या उत्तरदायित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. सद्या देशाच्या राजधानीत नवी दिल्लीत घडलेला व घडत असलेला घटनाक्रम याच अविश्वासाची आणि प्रशासकीय दडपशाहीची परिसीमा दाखवणारा ठरलेला आहे. व ठरत आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉंक्रोच जनता पार्टी. काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी जंतर-मंतरवर आंदोलन पुकारण्याची घोषणा केलेली होती. मात्र हे आंदोलन प्रत्यक्षात येण्याआधीच प्रशासनाने राजधानीत इंटरनेट व मेट्रो सेवा खंडित केली.आणि नागरिकांच्या संचार स्वातंत्र्यावर व्यापक निर्बंध लादले. अशा प्रकारच्या कृतीमुळे देशातील लोकशाही मूल्यावर गंभीर घाला घातला जात असल्याचे स्पष्ट होते. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली विशेष सुनावनी. आणि दिलेले निर्देश अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेले आहेत. न्यायालयाने मेट्रो. व इंटरनेट सेवा पूर्ववत करण्याचे आदेश दिलेले आहेत. शिवाय या शांततापूर्ण आंदोलनावर बळाचा अनावश्यक वापर टाळा. आणि नागरिकांवर बेकायदेशीरपणे कारवाई करू नका. असे स्पष्ट आदेश दिले. हे आदेश म्हणजे केंद्र सरकार आणि पोलीस प्रशासनाला मिळालेली एक सणसणीत चपराक मानावी लागेल. कोणत्याही लोकशाहीवादी देशात सरकार चालवताना नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक असते. आंदोलनाचा अधिकार जरी अमर्याद असला - नसला तरी आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असते. तरी त्या भितीच्या नावाखाली संपूर्ण शहराला वेठीस धरणे. किंवा संपूर्ण दळणवळण व्यवस्था विस्कळीत करणे योग्य ठरत नाही.आंदोलनात एखादी व्यक्ती नियम मोडत असेल तर त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई करण्यास कोणाचाही विरोध असणार नाही. मात्र त्यासाठी संपूर्ण आंदोलकांना संशयाच्या नजरेने पाहणे. आणि त्या आंदोलकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे. व शांततापूर्ण निषेधाला संभाव्य गुन्हा मानणे. हे पूर्णपणे घटनात्मक मूल्याशी विसंगत आहे. हे विसरून चालणार नाही. या संपूर्ण संघर्षाचे मूळ केवळ आंदोलनाच्या दडपशाहीमध्ये नाही तर त्या मागच्या कारणांमध्ये दडलेले दिसत आहे. भारतात निवडणुका नियमितपणे होणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्या निवडणुकाबद्दल आणि लोकशाही प्रक्रियेबद्दल सर्वसामान्य नागरिकांच्या मनात न ढळणारा विश्वास असणे आवश्यक आहे. विरोधी पक्षाने मुख्य निवडणूक आयुक्तावर गंभीर आरोप करताना देशातील तब्बल १३ कोटी नागरिकांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. मतदार यादीतील कथित अनियमितता. मतदानाच्या अधिकाराविषयी निर्माण झालेला संशय आणि निवडणूक आयोगाच्या कारभाराविषयीचा असंतोष. यावर केवळ राजकीय हेतूने आरोप केले आहेत म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. त्याचप्रमाणे आरोप झाले म्हणजे ते सिद्ध झाले. असेही मानण्याचे कारण नाही. परंतु त्या मागचे सत्य शोधून काढण्याची आणि पारदर्शक प्रक्रिया राबवण्याची मोठी नैतीक जबाबदारी संबंधित घटनात्मक संस्थांची असते. व आहे.सरकारने या प्रश्नाकडे केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पहाणे हे पहिले थांबवले पाहिजे. आणि यावर आत्मपरीक्षण करण्याची खरी गरज आहे. संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार कार्यालयाने सुद्धा या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दडपशाही टाळण्याचे स्पष्ट आवाहन केले आहे. निवडणूक आयोग ही केवळ एक प्रशासकीय संस्था नसून ती भारतीय लोकशाही वरील जनतेच्या विश्वासाचा सर्वोच्च आधारस्तंभ आहे. त्यामुळे या संस्थांच्या स्वायत्तेचे रक्षण संरक्षण करणे. आणि नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करणे. अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांचा असंतोष बळाचा वापर करून किंवा इंटरनेट व दळणवळण बंद करून तात्पुरता दडपून टाकला जाऊ शकतो. परंतु त्यातून जनतेच्या मनात कधीही विश्वास निर्माण करता येत नाही. उलट पारदर्शकता आणि निर्मळपणाच्या उत्तरदायित्वाद्वारेच अशा संस्थांची प्रतिष्ठा व मूल्य टिकून राहतात. दुसरीकडे आंदोलन करणा-यानी देखील नेहमी शांततापूर्ण मार्गाचा अवलंब करून कायद्याच्या चौकटीत राहूनच आपले म्हणणे मांडले पाहिजे. सरकारकडे अफाट सत्ता. कायद्याविषयी कायदेविषयक अधिकार. आणि प्रबळ प्रशासकीय यंत्रणा असल्यामुळे आंदोलनकर्त्यांनी संयम बाळगणे आणि नागरिकाच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करणे. ही सरकारची मुख्य नैतिक व घटनात्मक जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाचे ताजे निर्देश हा प्रशासनाला मिळालेला एक मोठा धडा आहे. लोकशाहीत असंमती किंवा विरोधात बोलणे ही कधीही शासनावरील अविश्वासाची अंतिम गोष्ट नाही. उलट ती व्यवस्था सुधारण्याची एक संधी असते. नागरिकांच्या रास्त प्रश्नांची उत्तर देण्याऐवजी जर त्यांचा आवाज कायमचा दाबण्याचा प्रयत्न केला गेला तर आजचा हा लहानसा संघर्ष उद्याच्या एका मोठ्या लोकशाही संकटाची पूर्व सूचना ठरण्याची शक्यता आहे. म्हणूनच अमर्याद सत्तेच्या बळावर नियंत्रण मिळवण्यापेक्षा संवादाचा आणि निर्मळपणाचा मार्ग स्वीकारणे आजच्या घडीला सर्वात जास्त आवश्यक आहे असे सर्वसामान्य जनतेचे म्हणणे आहे.

स्थापना दिनानिमित्त 'सेवा संकल्प अभियान' उत्साहात संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, पुणे व विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिबवेवाडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने समाजकल्याण विभागाच्या स्थापना दिनानिमित्त गुरुवार दि,१५ ऑक्टोबर रोजी 'सेवा संकल्प अभियान' कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती युवा पिढीपर्यंत पोहोचविणे, समाजातील वंचित, दुर्बल व गरजू घटकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी युवकांनी जनजागृतीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.



या अभियानांतर्गत 'सेवा माझे योगदान' व्यसनमुक्ती शपथ, आभार आणि संकल्पाची मानवी रांगोळी' तसेच समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी विशेष कार्यशाळा अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. व्यसनमुक्त समाजनिर्मिती, सामाजिक उत्तरदायित्व आणि समाजहितासाठी सकारात्मक योगदान देण्याचा संदेश या उपक्रमांच्या माध्यमातून देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना नशा मुक्तीची व ज्येष्ठ नागरिकांप्रती जाणीव जागृतीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमासाठी समाजकल्याण आयुक्त श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे (भा.प्र.से.), प्रादेशिक उपायुक्त श्रीमती वंदना कोचुरे, सहायक आयुक्त श्री. विशाल मंगल अशोक लोंढे तसेच विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. राजेश जालनेकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या शुभ हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाची प्रस्तावना करताना सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्री विशाल लोंढे यांनी सांगितले की, आज भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन "वाचन प्रेरणा" हा तसेच समाज कल्याण विभागाचा स्थापना दिन व सेवा संकल्प अभियान यांचा त्रिवेणी संगम गाठून आजच्या दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महामानवांकडून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी आपले जीवन उज्वल करावे. तसेच प्रादेशिक उपायुक्त श्रीमती वंदना कोचुरे मॅडम व विश्वकर्मा इन्स्टिट्यूट चे संचालक डॉ. राजेश जालनेकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा संदेश दिले. अध्यक्षीय मार्गदर्शनातून समाज कल्याण आयुक्त श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलमध्ये जास्त वेळ घालवण्यापेक्षा अभ्यासावर लक्ष केंद्रित करून "डिजिटल डिटॉक्स" ही संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनो तुमच्यासाठी पुढील चार-पाच वर्ष आयुष्याची पायाभरणी करण्यासाठी महत्त्वाची असून समाज कल्याण च्या विविध योजनांचा आपण लाभ घ्यावा असे आवाहन केले. समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी विशेष कार्यशाळेमध्ये समाजकल्याण निरीक्षक श्री शहागडकर सर यांनी विद्यार्थ्यांना समाज कल्याण च्या विविध योजनांची विस्तारपूर्वक माहिती दिली.

विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग हे या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले. युवा पिढीमध्ये सामाजिक संवेदनशीलता, सेवाभाव आणि समाजकल्याणाच्या कार्यात योगदान देण्याची प्रेरणा निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. समाजकल्याण विभागाचा स्थापना दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता सामाजिक जनजागृती, युवकांचा सहभाग आणि सेवाभावाचा संकल्प दृढ करणारा उपक्रम ठरला.

विदयार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून खाजाभाई बागवान यांचा स्मृतीदिन साजरा

■ सासवड (दै. संध्या)

सासवड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष. शिक्षण मंडळाचे माजी सभापती दिवंगत खाजाभाई बागवान यांचा तृतीय स्मृतीदिन त्यांच्या परिवाराच्या वतीने नगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला.येथील सावित्रीबाई फुले प्रशालेत झालेल्या या कार्यक्रमास माजी आमदार संजय जगताप प्रमुख अतिथी तर नगर पालिकेच्या पाणी पुरवठ्याचे सभापती ज्ञानेश्वर गिरमे व आरोग्य समिती सभापती राजन जगताप तसेच खाजाभाई यांचा मित्र परिवार यावेळी उपस्थित होता. वह्या, पेन्सिल, स्केचपेन, खोड रबर व खाऊचे यावेळी वाटप करण्यात आले खाजाभाई यांच्या काळातील



नगरपालिका व शिक्षण मंडळाच्या अनेक आठवणींना संजय जगताप यांनी उजाळा देत त्यांच्या कामाचा गौरव केला.कुटुंबातील अनेक मुलांना बागवान यांनी उच्च पदस्थ अधिकारी केले तसेच समाजातील अनेक जणांना अधिकारी बनवण्यात व कित्येकांना नोकरी लावण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता असेही जगताप यांनी सांगितले. बागवान यांची नात आयत बागवान व नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे यांनीही मनोगतातून बागवान यांना आदरांजली वाहिली. प्रशालेच्या मुख्याध्यापिका संगीता म्हेत्रे, दिलीप ओतारी अशोक पवार, प्रा संदिप टिळेकर, हारून बागवान, बिपीन वेदपाठक, दादा भुजबळ, मोबीन बागवान, बाळासाहेब कुलकर्णी, माऊली जगताप, सुमय्या बागवान, शकील बागवान, प्रकाश जगताप, संजीव कांबळे, शिवाजीराव राजीवडे, नारायण चधरी, हाजी सरवानभाई बागवान यांसह शिक्षक व विद्यार्थी व बागवान यांचे कुटुंबीय या प्रसंगी उपस्थित होते. संतोष देवकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन तर अँड अशपाक बागवान यांनी आभार मानले.

वडगाव निंबाळकर पोलिसांकडून दोन इसमांना दोन वर्षांसाठी हद्दपार



■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यालयाकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अन्वये वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीतील दोन इसमांना दोन वर्षांच्या कालावधीसाठी हद्दपार करण्याचा आदेश पारित करण्यात आला आहे. हद्दपार करण्यात आलेल्या इसमांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१. तेजस उर्फ दादू विजय सवाणे,वय २४ वर्षे,
२. अनिकेत उर्फ चिक्या विजय सवाणे,वय २७ वर्षे,
दोघेही रा. वाघळवाडी,ता. बारामती, जि.पुणे

सदर आदेशानुसार, वरील दोन्ही इसमांना पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर व हवेली तालुके ,पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर तसेच सातारा जिल्ह्यातील फलटण तालुका या क्षेत्रांतून दोन वर्षे (२४ महिने) कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले आहे. सदर कारवाई वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साबळे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक वारुळे, पोलीस हवालदार खेडकर, देवकर, तांबे, इनामदार, शेखर शेलार, खांडेकर, शिंदे तसेच पोलीस शिपाई पवार, जाधव,यादव, परगे, धोत्रे, भोसले व येटाळे यांनी केली.

बारामतीत विद्यार्थ्यांसाठी 'जागर आरोग्याचा-मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमांतर्गत विशेष चर्चासत्र

मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती आणि निरोगी जीवनशैलीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

■ बारामती (दै. संध्या)

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद' या उपक्रमांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या निर्देशानुसार आयोजित या चर्चासत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

चर्चासत्रात नशामुक्ती, मानसिक आरोग्य, आत्महत्या प्रतिबंध, निरोगी जीवनशैली, युवकांचे सक्षमीकरण, राष्ट्रनिर्माण आणि विकसित भारताच्या संकल्पनेतील युवकांचे योगदान या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना तंबाखू, मद्य आणि अमली पदार्थांच्या व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. तसेच अभ्यासाचा



ताण, परीक्षेची भीती, चिंता आणि नैराश्य यांसारख्या मानसिक आरोग्यविषयक समस्यांवर वेळीच मदत व समुपदेशन घेण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मानसिक तणावाचा सामना करणाऱ्या मित्रांना योग्य मदत करणे, संकटातील व्यक्तींची लक्षणे ओळखणे आणि गरज भासल्यास व्यावसायिक मदत घेणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, पुरेशी झोप आणि स्क्रीन टाइमचे योग्य नियोजन आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. याशिवाय युवकांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी, स्वयंसेवेची भावना आणि राष्ट्रनिर्मितीतील सक्रिय सहभाग विकसित करण्यावर भर देण्यात आला.

महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास मदत होणार असून, व्यसनमुक्त, मानसिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिक भान जपणारे युवक घडविण्यास या उपक्रमातून प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास डॉ.पाटील यांनी व्यक्त केला.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाकडे दौंड मराठा महासंघाचे निवेदन

पार्किंगला शिस्त लावा, रस्त्यावरील चेंबर्स समपातळीत आणा; ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरना रिफ्लेक्टर बंधनकारक करण्याची मागणी

■ दौंड (दै. संध्या)

दौंड शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अस्ताव्यस्त वाहन पार्किंग, रस्त्यांवरील उंच-सखल चेंबर्स आणि अपघातांचा वाढता धोका लक्षात घेता शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मा. तहसीलदार, दौंड तालुका, पोलीस निरीक्षक, दौंड पोलीस स्टेशन आणि मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे.

दौंड शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून, शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये, दवाखाने आणि विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर



होत आहे. दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्याच्या कडेला तसेच काही ठिकाणी अस्ताव्यस्त उभी केली जात असल्याने नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दौंड शहरातील हुतात्मा चौक ते शहीद भगतसिंग चौक, नगरमोरी ते भीमनगर, जुनी भाजी मंडई ते हुतात्मा चौक, भगतसिंग चौक ते गोपाळवाडी, भगतसिंग चौक ते पाटस रोड तसेच अहिल्यादेवी चौक (सहकार चौक) ते नवीन प्रशासकीय इमारत या मार्गांवर वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विशेष नियोजन करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संत मदर तेरेसा चौक (नगरमोरी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, हुतात्मा चौक, शालीमार चौक आणि शहीद भगतसिंग चौक (गोल राऊंड) या प्रमुख चौकांमधील वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात म्हटले आहे.

बायपास रस्त्यांचा प्रश्नही ऐरणीवर

दौंड शहरातून चारही दिशांनी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची संख्या लक्षात घेता शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी बायपास रस्त्यांचे नियोजन करून त्यांची निर्मिती करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

शहरातील रस्त्यांवर होणारे बेशिस्त पार्किंग रोखून दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी निश्चित पार्किंग व्यवस्था निर्माण करावी. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या, रस्त्यावर अडथळे निर्माण करणाऱ्या आणि नियमबाह्य पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय रस्त्यांच्या मधोमध असलेले उंच किंवा खोल चेंबर्स अपघातांना कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे शहरातील सर्व संबंधित चेंबर्स रस्त्याच्या समपातळीत आणून त्यांची तातडीने दुरुस्ती करावी. विशेषतः सहकार चौक ते नवीन प्रशासकीय इमारत या मार्गावरील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या बाबी दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

साखर कारखान्यांचा हंगाम सुरू झाल्याने दौंड शहरासह तालुक्यात ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर आणि ट्रॉलींची वर्दळ वाढणार आहे. रात्रीच्या वेळी या वाहनांचा अंदाज न आल्याने अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे ऊस वाहतूक करणाऱ्या प्रत्येक ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या मागील बाजूस तसेच आवश्यक ठिकाणी नियमानुसार रिफ्लेक्टर बसविणे बंधनकारक करावे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने संयुक्तपणे कार्यवाही करावी

दौंड शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे, नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि अपघातांना आळा घालणे यासाठी तहसील प्रशासन, पोलीस विभाग आणि दौंड नगरपरिषदेने संयुक्तपणे नियोजन करावे. वाहतूक कोंडीच्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. निवेदन देताना सर्व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



माणसांमध्ये असूनही जाणवणारे 'एकटेपण' चिंतेची बाब : विजया रहाटकर

पुणे : दैनिक संध्या

"आजूबाजूला माणसांची खूप गर्दी, सोशल मीडियात सक्रिय असूनही, जाणवणारे 'एकटेपण' ही चिंतेची बाब आहे. मनातील दुःख व्यक्त करण्यासाठी आणि आपले म्हणणे समजून घेणारी व्यक्ती शोधण्यासाठी अनेकांना संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत दुःखातून गेलेल्या व्यक्तींना एकत्र आणून त्यांचे अनुभव ऐकून घेणारे आणि त्यांना भावनिक आधार देणारे व्यासपीठ उभारणे महत्त्वाचे आहे. या एकटेपणावर मात करण्यासाठी 'अनुबंध'सारखे आधारगट निर्माण व्हायला हवेत," असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. बालेवाडी येथील उमरजी मदर अँड चाईल्ड केअर हॉस्पिटलच्या गर्भहानी व बालवियोग अनुभवलेल्या कुटुंबांसाठी सुरु करण्यात आलेल्या 'अनुबंध' या आधारगटाच्या उद्घाटनाप्रसंगी रहाटकर बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ लेखक, विचारवंत व तंत्रज्ञान अभ्यासक अच्युत गोडबोले, डॉ. प्रमोद उमरजी, डॉ. मुक्ता उमरजी, डॉ. चिन्मय उमरजी, डॉ. केतकी उमरजी, सौ. प्रियांका उमरजी आदी उपस्थित होते. 'वेदनेतून संवेदनेकडे... संवेदनेतून आधाराकडे' अशी या आधारगटाची मूळ संकल्पना आहे. त्याअंतर्गत 'उपचारांपलीकडची जबाबदारी - विज्ञान, संवेदना आणि सामाजिक भान' या विषयावर अच्युत गोडबोले यांचे विशेष व्याख्यान झाले. विजया रहाटकर म्हणाल्या, "अनेक पालकांना आपल्या मुलाला गमावण्याचे दुःख सहन करावे लागते. अशा कुटुंबांच्या वेदना समाजाला नेहमीच समजतात, असे नाही. त्यांच्याशी नेमके कसे बोलावे, कसे वागावे आणि त्यांना आधार कसा द्यावा, याबाबत समाजात पुरेशी जाणीव नसते. दुःखात असलेल्यांच्या भावना समजून घेऊन त्यांचा आदर करणे, ही सामाजिक संवेदनशीलतेची महत्त्वाची कसोटी आहे. सध्या आपल्या आजुबाजूला शेकडो जणांना विविध कारणांनी मानसिक आधाराची गरज असल्याचे दिसते. अशा लोकांना समजून घेण्यासोबतच त्यांचे ऐकण्याची सर्वाधिक गरज आहे. महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे, ती कुटुंबाचा आधार असल्याने तिचे आरोग्य उत्तम तर कुटुंब चांगले राहू शकेल." अच्युत गोडबोले म्हणाले, "पूर्वीच्या काळात एकत्र कुटुंबपद्धती आणि सामाजिक संबंधांमुळे माणसाला सुरक्षिततेची भावना होती; मात्र त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर काही मर्यादा होत्या. औद्योगिकीकरणानंतर माणसाला अधिक स्वातंत्र्य मिळाले, परंतु पारंपरिक सामाजिक आधारव्यवस्था कमकुवत झाल्याने एकटेपणा वाढला. आज सोशल मीडियावर हजारो मित्र असले, तरी मनातील भावना व्यक्त करण्यासाठी आणि अडचणीच्या वेळी आधार घेण्यासाठी जवळची व्यक्ती नाही. गर्दीतही एकटेपणा अनुभवण्याची ही समस्या गंभीर बनत आहे. त्यामुळे व्यक्तींना एकत्र आणणारे आणि परस्पर संवादाला प्रोत्साहन देणारे आधारगट आज पूर्वीपेक्षा अधिक आवश्यक आहेत." डॉ. चिन्मय उमरजी यांनी स्वागतपर प्रास्ताविकात या कार्यक्रमामागची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "आपल्याकडे आजही गर्भधारणेच्या बाबतीत स्त्रीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. मात्र तिच्याकडे माणूस म्हणून पाहणे अतिशय गरजेचे आहे. तिच्या मनाचा, भावनेचा विचार व्हायला हवा. बालवियोग झाल्यानंतर महिलेला शारीरिक आधार तर गरजेचा असतोच; पण मानसिक आणि भावनिकदृष्ट्या तिला सोबतीची किंवा आधाराची अधिक गरज असते.

नवीन एक्सपिरियन्स सेंटर्सद्वारे अँपिअरचा पुण्यात किरकोळ विक्रीचा विस्तार

पुणे : दैनिक संध्या

मौली गार्डन आणि विश्रांतवाडी येथे अनुक्रमे आनंदी अॅम्पीअर आणि एस कुडाळे कॉर्पोरेशन लिमिटेडचे उद्घाटन करून पुण्यातील आपली रिटेल आणि सेवा उपस्थिती अॅम्पीअरने आज अधिक मजबूत केली आहे. ही नवीन अॅम्पीअर एक्सपीरियन्स सेंटर्स ग्राहकांना एकाच छताखाली विक्री आणि सेवेचा सर्वसमावेशक अनुभव देतील, ज्यामुळे या भागातील ग्राहकांसाठी इलेक्ट्रिक मोबिलिटी अधिक सुलभ आणि सोयीस्कर होईल. या नवीन एक्सपीरियन्स सेंटर्समध्ये अॅम्पीअरच्या इलेक्ट्रिक स्कूटर पोर्टफोलिओचे प्रदर्शन केले जाईल, जो विविध प्रकारच्या मोबिलिटी गरजा आणि ग्राहक वर्गांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. या पोर्टफोलिओच्या केंद्रस्थानी 'अॅम्पीअर नेक्सस EX+' आहे, ज्यात नवीन 5 किलोवॅट क्षमतेची शक्तिशाली मोटर असून, भारतातील काही अत्यंत आव्हानात्मक भूप्रदेशांमधील तिची कामगिरी सिद्ध करणारे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विक्रम तिच्या नावावर आहेत. कुटुंबांसाठी आणि किमतीची काळजी असणाऱ्या ग्राहकांसाठी, मॅग्नस जीमॅक्स दैनंदिन उपयुक्तता, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि परवडणारी किंमत यांचा मेळ घालते, तर मॅग्नस निओची रचना एर्गोनॉमिक्स आणि शहरातील दैनंदिन आरामदायक प्रवासावर लक्ष केंद्रित करून करण्यात आली आहे. नुकतीच लॉन्च झालेली अॅम्पीअर रिओ व्हायब, विद्यार्थी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह तरुण रायडर्ससाठी पोर्टफोलिओचा विस्तार करते. अॅम्पीअर नेक्सस EX+ आणि मॅग्नस जीमॅक्स या गाड्या इंटेलिपॅकद्वारे समर्थित 30+ इंटेलिजेंट फीचर्स असलेल्या व्हेरिएंट्समध्येही उपलब्ध आहेत, जे रायडर्ससाठी कनेक्टेड, स्मार्ट तंत्रज्ञान आणतात. या पोर्टफोलिओला नेक्स्ट-जेन LFP बॅटरी तंत्रज्ञान आणि 5 वर्षे/75,000 किमी पर्यंतच्या स्टँडर्ड बॅटरी वॉरंटीचा आधार आहे, जे इलेक्ट्रिक मोबिलिटीला विश्वासार्ह आणि सुलभ बनवण्यावर अॅम्पीअरच्या असलेल्या लक्ष्याला अधिक बळकटी देते.

सिंहगडाच्या पायथ्याला बिबट्याचा दुचाकीवर हल्ला;

पुणे : दैनिक संध्या

सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याला खानापूर (ता. हवेली) जवळील बापुजीबुवा खिंडीत मंगळवारी (दि. १३) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याने मोटरसायकलवर चाललेल्या शेतकऱ्यासह दोन मुलींवर हल्ला केला. यामध्ये सुदैवाने तिघांचे प्राण वाचले. बिबट्याने सलोनी कोंडिबा थोपटे हिच्या पायाला ओरबाडले. त्यात ती जखमी झाली. सिंहगड-राजगड-तोरणागड जवळच्या अंतराने जोडणाऱ्या खानापूर-रांजणे-पाबे रस्त्यावर घनदाट जंगलातील बापुजीबुवा खिंडीत हा प्रकार घडल्याने नागरिकांच्या सुरक्षेसाठी सिंहगड वन विभागाने बिबट्याला पकडण्याची मोहीम सुरू केली आहे. पर्यटकांसह नागरिकांना खबरदारीचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. मंगळवारी सायंकाळी थोपटेवाडी येथील कोंडिबा थोपटे (वय ४८), त्यांची मुलगी सलोनी (वय १७) व तिची मैत्रीण मोना वैजनाथ राठोड (वय १८) हे तिघेजण बाजारहाट करण्यासाठी खानापूर येथे मोटरसायकलने चालले होते. बापुजीबुवा मंदिराच्या वळणातून जात असताना अचानक एक बिबट्या समोर आला. लाईटच्या उजेडाने बिबट्या सैरभैर झाला. काही क्षणातच त्याने मोटारसायकलच्या मागे बसलेल्या सलोनी हिच्या पायाला ओरखडे काढले. त्यामुळे तिने जोरदार हंबरडा फोडला.

श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे महिला शास्त्रज्ञांचा सन्मान

आयसरचे संचालक सुनिल भागवत यांच्या हस्ते गौरव ; नारी शक्तीचा सन्मान सोहळा



■ पुणे : (दै. संध्या)

भारताला विकसित राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करताना गगनभरारी घेण्यात मोठी भूमिका बजावणाऱ्या महिला शास्त्रज्ञांचा सन्मान सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे करण्यात आला. भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन परिषदेचे (आयसर) संचालक डॉ. सुनिल भागवत यांच्या हस्ते सन्मान सोहळा पार पडला.

यावेळी विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे उपाध्यक्ष प्रा. डॉ. वासुदेव गाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मंदिर ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ.तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, अॅड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले आदी मान्यवर देखील उपस्थित होते. कार्यक्रमात प्रा. डॉ. सुवर्णा दातार, डॉ. तेजश्री भावे, डॉ. पुराबी गाराई, डॉ. शिल्पा जैन, डॉ. मंजु मदान या महिला शास्त्रज्ञांचा गौरव करण्यात आला.

डॉ. सुनिल भागवत म्हणाले, विज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात जबाबदारी व त्याचा परिणाम हे खूप महत्वाचे असते. विज्ञान समाजाला उत्तरदायी असले पाहिले, असे ज्येष्ठ शास्त्रज्ञ सी व्ही रमण यांनी सांगितले होते.

पुढील पिढी ही स्पेस टेक्नालॉजीची आहे. या पिढीचे प्रश्न सोडविण्यावर आपण काम करावे. संरक्षण आणि शिक्षण क्षेत्रात आजवर अनेक महिलांनी गौरवपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांची परंपरा आपण पुढे चालू ठेवली आहे, याचा खूप आनंद होतो.

भरत अग्रवाल म्हणाले, मंदिरातर्फे नवरात्रोत्सवात नारी शक्तीचा सन्मान करण्यात येतो. आपल्यासारख्या संशोधक महिलांनी आपल्या कर्तृत्वाने मानवी जीवन अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

आपल्या कार्याचा सन्मान करण्याचे भाग्य आम्हाला लाभले, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी युवराज लाहोटी यांनी प्रास्ताविक केले, विशाल सोनी यांनी महिला शास्त्रज्ञांचा परिचय करुन दिला. महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

'दगडूशेठ' गणपती ट्रस्ट तर्फे ५०० ज्येष्ठांना मोफत श्रवणयंत्र



■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जय गणेश रुग्णसेवा अभियानातंर्गत महाराष्ट्राच्या विविध भागातील ५०० ज्येष्ठ नागरिकांना मोफत श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी, कोषाध्यक्ष सुनील रासने, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, विश्वस्त राजेंद्र गावडे, विश्वस्त पराग वांबुरे, राजाभाऊ घोडके, विलास रासकर, राजेंद्र पायमोडे, सुवर्णयुग तरुण मंडळ अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, सनी सिद्ध, ऋणाल केसरकर ,विशाल केदारी, तुषार रायकर, दिनेश परदेशी, महादेव पवार, इंद्रजीत रायकर, संतोष रसाळ यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अॅलिम्को कंपनीच्या संयुक्त विद्यमाने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ट्रस्टचे वैद्यकीय सेवा प्रमुख राजेंद्र परदेशी आणि सहकाऱ्यांनी उपक्रमाचे व्यवस्थापन केले.

ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' हे ब्रीद अंगीकारून ट्रस्ट कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागातील गरजू रुग्णांसाठी विविध सेवा दिल्या जात आहे. त्यापैकी ज्येष्ठ नागरिकांना मोफत श्रवणयंत्र वाटप हा उपक्रम राबविला जात आहे. ज्येष्ठ नागरिकांची पूर्व नोंदणी झाल्यानंतर त्यांच्या कानाचे माप घेऊन त्यानुसार यंत्र दिले जाते. त्यामुळे भविष्यात रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यासारख्या भागातून तसेच बीड, जालना, परभणी, नांदेड, यवतमाळ अशा विविध जिल्ह्यातील लाभार्थींचा सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत ३२ हजार नागरिकांना मोफत श्रवण यंत्राचे वाटप करण्यात आले.

समृद्ध बावा आणि मुस्कान बामणे यांनी नवरात्रीचे क्षण केले शेअर

■ पुणे (दै. संध्या)

नवरात्री हा असा सण आहे जो सोबत संगीत, उत्सव, कुटुंब आणि जपलेल्या परंपरा घेऊन येतो. अनेकांसाठी हा एकत्र येण्याचा, गरब्याच्या रात्रींचा आनंद घेण्याचा आणि आपल्या प्रियजनांसोबत सणाचा उत्साह साजरा करण्याचा काळ असतो. नवरात्री त्यांच्यासाठी खास का आहे हे सांगताना, सोनी सबच्या 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेतील अश्विन (समृद्ध बावा) आणि शनाया (मुस्कान बामणे) यांनी या सणाशी निगडित त्यांच्या आवडत्या परंपरा आणि वैयक्तिक आठवणींबद्दल मनमोकळेपणाने सांगितले.

अश्विनची भूमिका साकारणाऱ्या समृद्ध बावाने सांगितले,, "नवरात्रीत मला सर्वांत आवडणाऱ्या गोष्टींपैकी एक म्हणजे या सणादरम्यान विविध पंडालांना भेट देणे. प्रत्येक पंडालचे स्वतःचे वेगळे वातावरण, सजावट आणि उत्साह असतो, आणि कुटुंबीय व मित्रांसोबत तो अनुभव घेण्यात एक वेगळीच मजा असते. नवरात्रीच्या काळात मिळणाऱ्या खाद्यपदार्थांचीही मी आतुरतेने वाट पाहतो, विशेषतः विविध सणासुदीचे पदार्थ आणि उपवासातील खास तयारी चाखण्याची. 'पुष्पा इम्पॉसिबल'च्या सेटवर साजरा केलेला उत्सवही तितकाच खास असतो, कारण आम्हाला बापोदरा चाळीत तो सणाचा उत्साह आणता येतो आणि हे छोटे-छोटे आनंदाचे क्षण एकत्र साजरे करता येतात." शनायाची भूमिका साकारणाऱ्या मुस्कान बामणेने सांगितले, "माझ्यासाठी नवरात्री म्हणजे माझी आवडती घागरा-चोळी घालून

रात्रगस्तीवरील पोलिस हवालदाराला धक्काबुक्की

पुणे : दैनिक संध्या

अंधारात संशयास्पदरीत्या थांबलेल्या तीन तरुणांकडे विचारपूस करण्यासाठी गेलेल्या रात्रगस्तीवरील पोलिस हवालदाराला धक्काबुक्की करून त्यांच्या अंगावरील वर्दीचे बटन तोडल्याची घटना समोर आली आहे. यासह सरकारी स्कार्पिओ गाडीची डाव्या बाजूच्या आरशाची काच देखील फोडण्यात आली. याबाबत उरुळी कांचन येथील तिघांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम रवींद्र लोणारी, ओंकार राजू वाकचोरे आणि धीरज लक्ष्मण नागटिळे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत.

फुले-आंबेडकरांचा सामाजिक समतेचा विचार पुढे नेणे ही काळाची गरज



■ पुणे (दै. संध्या)

"आज शिक्षणाच्या बळावर महिला सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने प्रगती करत आहेत. त्यांच्या या प्रगतीचा पाया महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी घातला, याचे भान समाजाने ठेवले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना आपले महान गुरू मानले होते. सामाजिक समता, शिक्षण आणि मानवमुक्तीसाठी फुले-आंबेडकरांनी केलेले कार्य आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण करून सामाजिक समतेचा हा विचार पुढे नेणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी केले.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद' यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा सन्मान' सोहळ्यात ते बोलत होते. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक परिवर्तनासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल, फुले पगडी असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार (मुंबई), ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ताजी गायकवाड (सोलापूर), ज्येष्ठ पत्रकार व लेखक अशोक गोपाल (पुणे) आणि सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय काळेबेरे (पुणे) यांना सन्मानित करण्यात आले. नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात झालेल्या सोहळ्यावेळी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, हिंदी भाषेचे ज्येष्ठ विद्वान आणि लेखक डॉ. दामोदर खडसे, आंबेडकरी चळवळीतील 'लोकशाहीसाठी समंजस संवाद'चे संपादक व ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, सल्लागार विजय जाधव उपस्थित होते. डॉ. दामोदर खडसे म्हणाले, "देशभरातील दलित साहित्याच्या निर्मितीचे श्रेय हे मराठी भाषा आणि महाराष्ट्राला जाते. त्यानंतर देशभरातील विविध भागातून दलित साहित्य लिहीले गेले. दया पवार हे या साहित्यातील एक महत्त्वाचे नाव असून, त्यांनी दलित साहित्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. 'बलुतं' या कादंबरीच्या संपूर्ण प्रवासाचा साक्षीदार आहे. त्यानंतर दलित साहित्यात बरेच लिखाण झाले. फुले आणि आंबेडकर यांच्या कार्यावरही मोठ्या प्रमाणात लिखाण झाले, पण आजच्या घडीला लिखाणातून समाजात खरंच परिवर्तन झाले का हा प्रश्न कायम आहे. हे परिवर्तन झाले नसेल, तर आपल्याला अजूनही काम करण्याची आवश्यकता आहे, हेच यातून दिसून येते."

श्री महालक्ष्मी मंदिरासमोर पुष्पवर्षावात अष्टलक्ष्मी भव्य मिरवणूक

■ पुणे (दै. संध्या)

आई तुझ्या ग चरणी... आई गोंधळाला ये... च्या तालावर पुणेकरांनी माता माता की जय... चा गजर केला. श्री महालक्ष्मी मंदिरासमोर भंडाऱ्याची उधळण आणि पुष्पवृष्टीत अष्टलक्ष्मी भव्य रथयात्रा मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये शेकडो देवीभक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सवात हा भव्य दिव्य सोहळा पार पडला. यावेळी मंदिर ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, मंदिराच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, अॅड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर यांसह विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला. अशाप्रकारे नवरात्रात पहिल्यांदाच मंगळवारच्या औचित्यपूर्ण महत्त्व लक्षात घेऊन अशी वैविध्यपूर्ण शोभायात्रा काढण्यात आली आणि त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल म्हणाल्या, श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या आदिशक्तीच्या त्रिदेवी स्वरूपाचे पवित्र अधिष्ठान असलेल्या श्री महालक्ष्मी मंदिरात अष्टलक्ष्मी भव्य रथयात्रा सोहळा यापूर्वी झालेला नव्हता. त्यामुळे यंदा मंदिरातर्फे हा सोहळा आयोजित करण्यात आला. मंदिरासमोर पुष्पवृष्टी करून या रथयात्रा सोहळ्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

विश्वकर्मा विद्यापीठातील पदाधिकारी, मंदिराचे कार्यकर्ते व राजेश अंबिके, शेखर निवंगुणे यांच्या सहकार्याने हा सोहळा पार पडला. मंदिरा बाहेर दररोज सायंकाळी ७.३० वाजता गंगा आरती आयोजन करण्यात येत असून याला देखील नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



२४ ऑक्टोबरला 'विक्रोळीचा राजा'ची पदयात्रा; सिद्धिविनायक दर्शनाची संधी

मुंबई : दैनिक संध्या

कन्नमवार नगर १ उत्सव समितीतर्फे 'विक्रोळीचा राजा'च्या भक्तांसाठी शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा रात्री १० वाजता विक्रोळीचा राजा सभागृहातून सुरू होऊन प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिरात पोहोचणार आहे. पदयात्रेत सहभागी होणाऱ्या गणेशभक्तांना रविवार, २५ ऑक्टोबरच्या पहाटे श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेता येणार आहे. पदयात्रेत सहभागी होणाऱ्या भक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी समितीतर्फे बसची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच प्रवासादरम्यान सहभागी भक्तांना स्नॅक्स आणि पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. पदयात्रेसाठी नोंदणी केलेल्या सर्व भक्तांना पुढील सूचना आणि नियोजनाची माहिती देण्यासाठी व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात येईल. इच्छुक भक्तांनी आयोजकांनी प्रसिद्ध केलेल्या फ्लायरवरील क्यूआर कोड स्कॅन करून नोंदणी करावी, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्याध्यक्ष भूषण गावडे, अध्यक्ष अक्षय दांभोळकर, सचिव आदिनाथ माने आणि खजिनदार प्रणित तळेगावकर मार्गदर्शन करीत आहेत. पदयात्रेबाबत अधिक माहितीसाठी अनुज यांच्याशी ८७९१० ८९१३१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन समितीने केले आहे.



युवकांसाठी काहीच केले जात नाही असे चुकीचे चित्र देशात निर्माण केले जात आहे

पुणे : दैनिक संध्या

भारतामध्ये आज वेगळे वातावरण निर्माण केले जात आहे. युवकांसाठी काहीच केले जात नाही, देशात सर्व काही चुकीचे घडत आहे, असे चित्र युवकांसमोर आणले जात आहे. मात्र, तुम्ही विद्यार्थी या देशाचे भवितव्य आहात. भारत हा जगातील सर्वांत तरुण देश असून देश घडविण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची आहे, असे मत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या एमएसो सीनिअर कॉलेजच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या शुभारंभ आणि गुणगौरव समारंभात ते बोलत होते. मयूर कॉलनीतील बाल शिक्षण मंदिरच्या एमईएस सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक होते. नियामक मंडळाच्या उपाध्यक्ष आनंदी पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रवींद्र वैद्य, उपप्राचार्या डॉ. पूनम रावत यावेळी उपस्थित होते. मुरलीधर मोहोळ म्हणाले, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने माझ्यासारख्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांवर संस्कार केले आणि राष्ट्रभक्तीचे शिक्षण दिले. या संस्थेने एका सामान्य कुटुंबातून आलेल्या मला मूल्यांची शिकवण दिली. ते पुढे म्हणाले, विद्येचे माहेरघर ही पुण्याची सगळ्यात मोठी ओळख आहे. आपल्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. देशातूनच नाही तर जगभरातून मुले येथे येऊन शिक्षण घेतात. यासाठी अनेक शिक्षण संस्था पुण्यात आहेत. त्यापैकी एक मोठी संस्था म्हणजे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आहे. संस्थेला १६५ वर्षांची परंपरा आहे. आताच्या काळाला आवश्यक आधुनिक कोर्सेस महाविद्यालयात सुरू आहेत, असे मोहोळ म्हणाले. गेल्या काही दिवसांत विविध प्रकारची आंदोलने सुरू आहेत आणि अनेक विषयांवर चर्चा होत आहे. मात्र, आज जगातील अनेक देश भारताकडे विचार करणारा आणि नेतृत्व करणारा देश म्हणून पाहत आहेत. भारत हा जगातील सर्वांत तरुण देश आहे. त्यामुळे देशातील युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तुम्ही देशाचे भविष्य आहात, असेही त्यांनी सांगितले. रवींद्र वैद्य म्हणाले, महाविद्यालयात पारंपरिक शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले कौशल्याधारित शिक्षणही दिले जाते. उद्योगक्षेत्रात विद्यार्थ्यांना कोणत्या कौशल्यांची आवश्यकता आहे, याचा विचार करून त्यानुसार शिक्षण दिले जाते.

पहिल्या सहामाहीतील कामगिरीचा दावा

■ फसवणूक रोखण्यासाठी आठस्तरीय सुरक्षा व्यवस्था आणि एक अब्ज डॉलरचा आपत्कालीन राखीव निधी

मुंबई/पुणे : दैनिक संध्या

क्रिप्टोकरन्सी व्यवहारांसाठी ओळखल्या जाणाऱ्या बिनान्स या जागतिक व्यासपीठाने २०२६ च्या पहिल्या सहामाहीत आपल्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुरक्षा यंत्रणांच्या मदतीने ८० लाखांहून अधिक वापरकर्त्यांचे संरक्षण केल्याचा आणि सुमारे ४.६ अब्ज डॉलरचे (अंदाजे ३८,६४० कोटी रुपये) संभाव्य आर्थिक नुकसान रोखल्याचा दावा केला आहे. वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन फसवणूक, बनावट संदेश आणि माहिती चोरणाऱ्या संकेतस्थळांना आळा घालण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचे कंपनीने म्हटले आहे. बिनान्सच्या माहितीनुसार, संशयास्पद व्यवहार आणि हालचाली ओळखण्यासाठी कंपनी १०० हून अधिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रारूपांचा वापर करते. ही यंत्रणा संभाव्य धोके ओळखून वापरकर्त्यांना सावध करते. २०२६ च्या पहिल्या सहामाहीत ४२ हजारांहून अधिक धोकादायक डिजिटल पत्ते प्रतिबंधित करण्यात आले, तर दररोज १४ हजारांहून अधिक तात्काळ सुरक्षा सूचना देण्यात आल्या. जोखमीशी संबंधित ८० ते ९० टक्के निर्णय कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीद्वारे घेतले जात असल्याचेही कंपनीने नमूद केले आहे. अधिक बारकाईने तपासणी आवश्यक असलेल्या प्रकरणांमध्ये मानवी तज्ज्ञ हस्तक्षेप करतात. वापरकर्त्यांची खाती सुरक्षित ठेवण्यासाठी बिनान्सने आठस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू केली आहे. संशयास्पद हालचालींबाबत ई-मेल आणि अनुप्रयोगाद्वारे सूचना देणे, एकवेळ वापरता येणाऱ्या संकेतांकाद्वारे पडताळणी करणे, नवीन उपकरण किंवा अनोळखी ठिकाणावरून प्रवेश झाल्यास अतिरिक्त तपासणी करणे आणि पासकीच्या माध्यमातून सुरक्षित प्रवेश उपलब्ध करणे, अशा उपायांचा यात समावेश आहे. याशिवाय, अधिक जोखमीच्या व्यवहारांसाठी चेहऱ्याद्वारे ओळख पडताळणी, संशयास्पद प्रवेश आढळल्यास सर्व उपकरणांवरील सक्रिय सत्रे बंद करणे, संशयास्पद पैसे काढण्याच्या व्यवहाराला नकार देणे आणि गंभीर परिस्थितीत पैसे काढण्याची सुविधा तात्पुरती स्थगित करणे, असे उपायही कंपनीकडून वापरले जातात. बिनान्सने जुलै २०१८ मध्ये वापरकर्त्यांच्या संरक्षणासाठी 'सिक्युअर ॲसेट फंड फॉर युझर्स' (एसएएफयू) या आपत्कालीन राखीव निधीची स्थापना केली.

पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी आमदार निकम आक्रमक!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाणीटंचाई निवारणासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी

■ मुंबई (दै. संध्या)



रत्नागिरी जिल्ह्यात सन २०२६ च्या खरीप हंगामात पावसातील दीर्घ खंडामुळे भात व नाचणी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी आमदार शेखर निकम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे विविध मागण्या केल्या आहेत.

रत्नागिरी, राजापूर व संगमेश्वर या तीन तालुक्यांचा 'ट्रिगर-१' अंतर्गत समावेश करण्यात आला असताना, चिपळूण, दापोली, खेड, मंडणगड, लांजा व गुहागर या उर्वरित सहा तालुक्यांचाही दुष्काळग्रस्त क्षेत्रात समावेश करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. जिल्ह्यातील खरीप पीक नुकसान पंचनाम्यांसाठी ५५,९६८ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून, आतापर्यंत ४,८३३.१८ हेक्टर क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण झाले आहेत. एकूण १७,०८४ शेतकरी बाधित आढळले असून, उर्वरित पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

दरम्यान, संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विंधण विहिरी, नळ पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती आणि विहिरींचे खोलीकरण अशा १६४ प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर करून तातडीने कार्यवाही करावी,अशी मागणी आमदार निकम यांनी केली आहे. याचबरोबर, चिपळूण तालुक्यातील पिंपळी खुर्द येथे शासकीय मत्स्यबीज केंद्र उभारण्यासाठी ही त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना स्वतंत्र पत्र दिले आहे. या केंद्रामुळे स्थानिक मत्स्य व्यावसायिकांना दर्जेदार मत्स्यबीज उपलब्ध होण्यास मदत होईल, तसेच युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होऊन जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायाला चालना मिळेल. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आग्रही विनंती त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, ग्रामीण भागाला पाणीटंचाईतून दिलासा आणि मत्स्य व्यवसायाच्या विकासाला चालना मिळावी, यासाठी या सर्व मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आमदार शेखर निकम यांनी नमूद केले आहे.

चिपळूणच्या विकासासाठी आमदार शेखर निकम यांचा पुढाकार!

मत्स्यबीज केंद्र, स्थानिक युवकांना रोजगार आणि वाशिष्ठी नदीतील गाळ उपशासाठी मत्स्यव्यवसाय मंत्र्यांकडे पाठपुरावा

■ चिपळूण : (दै. संध्या)



चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघातील मत्स्यव्यवसायाला चालना देणे, स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि चिपळूण शहराचा पूरधोका कमी करणे, या उद्देशाने आमदार शेखर निकम यांनी मा. मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या बैठकीत तीन महत्त्वपूर्ण विषयांचा पाठपुरावा केला. मौजे करबवणे येथील शासकीय जमिनीवर मत्स्यबीज केंद्र उभारणे, मौजे पिंपळी खुर्द येथील जागा मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरित करणे आणि वाशिष्ठी नदीतील टप्पा-३ अंतर्गत गाळ उपशाचे काम मार्गी लावणे, या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. मंत्री महोदयांनी तिन्ही विषयांवर सकारात्मक व आश्वासक प्रतिसाद दिला.

मौजे करबवणे, ता. चिपळूण येथील हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड कंपनीच्या नावे असलेली जमीन महसूल थकबाकीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नावे करण्यात आली आहे. गाव नमुना ८-अ, खाते क्र. १४७९ नुसार या जमिनीचे एकूण क्षेत्र १३.८९८० हेक्टर (सुमारे ३४.३ एकर) आहे. यापूर्वी मत्स्यबीज केंद्रासाठी केवळ दोन हेक्टर क्षेत्र उपलब्ध असल्याची प्राथमिक माहिती विचारात घेण्यात आली होती.

ही बाब लक्षात आणून देत आमदार निकम यांनी संपूर्ण शासकीय क्षेत्राचा विचार करून जागेची फेरतपासणी करण्याची मागणी केली. वाशिष्ठी नदीपासून जवळ असलेल्या या जागेवर पाण्याची उपलब्धता व तांत्रिक व्यवहार्यता तपासून मत्स्यबीज केंद्र अथवा अन्य रोजगारपूरक मत्स्यव्यवसाय प्रकल्प उभारण्याची शक्यता त्यांनी मांडली.

मौजे पिंपळी खुर्द, ता. चिपळूण येथील गट क्र. २१ मधील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील सुमारे १० हेक्टर (२५ एकर) जागेवर मत्स्यबीज केंद्र उभारण्याचा प्रस्ताव आमदार शेखर निकम यांनी बैठकीत मांडला. या जागेवर वीजपुरवठा, बारमाही पाण्याची उपलब्धता आणि जोडरस्ता यांसारख्या सुविधा आहेत. तसेच, मत्स्य महाविद्यालय, शिरगाव येथे करण्यात आलेल्या पाणी परीक्षणात पाणी मत्स्यबीज उत्पादनासाठी योग्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित विभागांच्या संयुक्त स्थळपाहणीतही ही जागा योग्य असल्याचे प्राथमिक निष्कर्ष समोर आले आहेत. मात्र, ही जागा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अखत्यारीत असल्याने तिचे मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरण होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी आमदार निकम यांनी केली.

तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्याची मागणी!



■ नवी दिल्ली : (दै. संध्या)

युट्युबर ध्रुव राठी याने प्रसारित केलेल्या"हिंदू बीफ खातात का?"("Can Hindus Eat Beef?") या वादग्रस्त व्हिडिओच्या माध्यमातून सनातन हिंदु धर्म, हिंदु धर्मग्रंथ तसेच प्रभू श्रीराम, माता सीता आणि भगवान श्रीकृष्ण यांचा गंभीर विडंबन व अपमान करण्यात आला आहे. या व्हिडिओमुळे संतानीयांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत, हे माननीय दिल्ली उच्च न्यायालयानेही स्पष्टपणे मान्य केले आहे. न्यायालयाच्या याच महत्त्वाच्या निर्देशानुसार दिल्ली या प्रकरणाबाबत 'अक्शन टेकन रिपोर्ट' (ATR) सादर करण्याचे आदेश दिल्ली पोलिसांना दिले आहेत. याशिवाय, भारत सरकारच्या ग्रीव्हन्स कमिटीच्या (GAC) निर्देशानंतर हा आक्षेपार्ह व्हिडिओ युट्यूबवरून (YouTube) भारतातून हटवण्यातही आला आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत हिंदु जनजागृती समितीने दिल्ली पोलिसांच्या आयुक्तांना निवेदन सादर केले आहे. ध्रुव राठी भारतात आला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दोषी ध्रुव राठीवर तात्काळ फौजदारी गुन्हा (FIR) दाखल करण्यात यावा, त्याला तात्काळ ताब्यात घेण्यात यावे आणि आवश्यक कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी समितीने केली आहे.

याशिवाय समितीने ध्रुव राठीच्या "केराला स्टोरी २ एक्सपोज" ("Kerala Story 2 Exposed") या आणखी एका वादग्रस्त व्हिडिओचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून समाजात दुही माजवणारे आणि हिंदूंच्या धार्मिक भावनांना ठेच पोहोचवणारे आक्षेप घेण्यात आले आहेत. यावर प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून योग्य ती पावले उचलली पाहिजेत, असे समितीचे म्हणणे आहे.

हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी स्पष्ट केले की, "धार्मिक श्रद्धा आणि सनातन संस्कृतीच्या आराध्य देवतांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. माननीय न्यायालयाच्या निर्देशानुसार दिल्ली पोलिसांनी या प्रकरणात तात्काळ कठोर कारवाई करावी."

१३० किलो वजनाच्या रुग्णावर यशस्वी हृदय बायपास शस्त्रक्रिया

■ पुणे : (दै. संध्या)

पिंपरी येथील डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी सुमारे १३० किलो वजनाच्या ४६ वर्षीय रुग्णावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हृदयाची बायपास शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली. विशेष म्हणजे, छातीचे हाड न कापता बरगड्यांमधून केवळ ३ ते ५ सेंटीमीटरचा छेद देऊन ही जटिल शस्त्रक्रिया करण्यात आली. अतिलठ्ठपणा, मधुमेह आणि झोपेत श्वास घेण्यास अडथळे येण्याचा त्रास असलेल्या रुग्णावरील या उपचारामुळे प्रगत हृदयशस्त्रक्रियेतील तज्ज्ञतेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

सुमारे तीन वर्षांपूर्वी रुग्णाच्या हृदयातील अनेक रक्तवाहिन्यांमधील अडथळे दूर करण्यासाठी अँजिओप्लास्टी करण्यात आली होती. मात्र, दोन ते तीन वर्षांत पुन्हा गंभीर अडथळे निर्माण झाल्याने डॉक्टरांनी बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला दिला. रुग्णाची एकूण प्रकृती आणि सहविकार लक्षात घेऊन डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील हृदय व छातीच्या शस्त्रक्रियेचे तज्ज्ञ डॉ. आशिष बाविस्कर आणि त्यांच्या पथकाने कमी छेदातून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

वीजपुरवठा विस्कळीत होत असल्याने ३० ऑक्टोबरला रास्ता रोको

■ चाकण : (दै. संध्या)

तीर्थक्षेत्र येलवाडी आणि पंचक्रोशीतील गावांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून वीजपुरवठा विस्कळीत होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. महावितरणच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास ३० ऑक्टोबर रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा येलवाडी ग्रामस्थांसह तळेगाव - चाकण महामार्ग कृती समितीने दिला आहे.

येलवाडी आणि परिसरातील गावांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. काही वेळा दिवसांतून आठ ते दहा तास वीज गायब असते. तर काही गावांतील विशिष्ट भागांमध्ये चार ते पाच दिवस वीजपुरवठा खंडित राहिल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. यामुळे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले असून, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत आहे. दवाखाने, मेडिकल दुकाने आणि विविध व्यावसायिकांनाही या अनियमित वीजपुरवठ्याचा फटका बसत आहे. विजेच्या अनियमिततेमुळे विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी, कामगार, व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वीजपुरवठ्यातील या गंभीर समस्येकडे महावितरणचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून आहे. व्होल्टेजच्या चढ - उतारामुळे उपकरणांचे नुकसान होत आहे. वीजपुरवठा खंडित होण्यासोबतच विजेचा दाब, व्होल्टेज कमी जास्त होत असल्याने घरातील अनेक विद्युत उपकरणे जळाली आहेत. शेतकऱ्यांच्या पाणी उपसण्याच्या मोटारीही जळाल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे शेतीची कामे, लहान मोठे व्यवसाय आणि घरगुती कामांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. वीजपुरवठ्यात वारंवार होणारे खंड आणि व्होल्टेजमधील चढ उतारांमुळे येलवाडी ग्रामस्थांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महावितरणने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी येलवाडी गावचे माजी सरपंच नितीन गाडे यांनी केली आहे. कृती समितीने लोडशेडिंगचा दिवस आणि वेळ निश्चित करण्याची प्रमुख मागणी केली आहे. लोड शेडिंगची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत निश्चित करावी.

राहुल गांधींचे अपयश आणि काँग्रेसचे आत्मचिंतन

पराभवाचे खापर दुसऱ्यांवर फोडण्यापेक्षा नेतृत्वातील त्रुटी शोधणे गरजेचे : अमित शहा

■ मुंबई : (दै. संध्या)



राजकारणात विजय मिळवण्यासाठी केवळ आरोपांची सरबत्ती, आंदोलनांचा गाजावाजा आणि प्रसिद्धीच्या झोतात राहणे पुरेसे नसते. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी ठोस विचार, प्रभावी नेतृत्व, संघटनात्मक ताकद आणि लोकांच्या प्रश्नांशी जोडलेली भूमिका आवश्यक असते. निवडणुकीतील वारंवारच्या पराभवांनंतरही एखाद्या पक्षाला आपल्या रणनीतीतील त्रुटी लक्षात येत नसतील, तर त्या पक्षाच्या राजकीय भवितव्याबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्या राजकीय वाटचालीचे मूल्यमापन करताना या बाबींचा विचार करणे आवश्यक ठरते.

काँग्रेस हा देशाच्या राजकीय इतिहासातील महत्त्वाचा पक्ष आहे. स्वातंत्र्यलढ्यापासून ते देशाच्या सत्ताकारणापर्यंत या पक्षाची मोठी भूमिका राहिली आहे. मात्र, ऐतिहासिक वारसा हा वर्तमानातील यशाची हमी देत नाही. काळानुसार बदलणाऱ्या जनतेच्या अपेक्षा समजून घेणे, नव्या पिढीशी संवाद साधणे आणि स्थानिक प्रश्नांवर प्रभावी उपाय मांडणे, या गोष्टी राजकीय पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असतात. याच आघाड्यांवर काँग्रेसला आपल्या कार्यपद्धतीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. निवडणुकीत पराभव झाला की विरोधकांवर आरोप करणे सोपे असते. निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करणेही राजकीय चर्चेचा भाग असू शकतो; मात्र प्रत्येक पराभवाचे स्पष्टीकरण केवळ विरोधकांच्या रणनीतीत किंवा निवडणूक यंत्रणेत शोधल्याने पक्षाची परिस्थिती बदलत नाही. मतदारांनी दिलेला कौल समजून घेणे, पक्षाच्या धोरणांतील उणिवा शोधणे आणि संघटनात्मक पातळीवर आवश्यक बदल करणे, ही नेतृत्वाची जबाबदारी असते.

राहुल गांधी यांनी काँग्रेसचे नेतृत्व करताना अनेक राजकीय आव्हानांचा सामना केला आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये पक्षाला काही ठिकाणी यश मिळाले असले, तरी अनेक राज्यांमध्ये संघटना कमकुवत राहिल्याचे चित्र दिसते. त्यामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाने विजयाच्या दाव्यांपेक्षा पक्षाची प्रत्यक्ष ताकद, मतदारांशी असलेला संपर्क आणि स्थानिक नेतृत्वाची क्षमता यांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजेच एसआयआर हा देशातील राजकीय चर्चेचा महत्त्वाचा विषय बनला आहे. मतदार याद्यांमधील अनियमितता दूर करणे, पात्र मतदारांची नावे कायम ठेवणे आणि अपात्र नोंदींची पडताळणी करणे, या प्रक्रियेत पारदर्शकता असणे गरजेचे आहे. त्याचवेळी पात्र नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर अन्याय होणार नाही, याचीही दक्षता आवश्यक आहे.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



रावेत, किवळे प्रभाग १६ मधील पाणीपुरवठ्याची परिस्थिती सुधारा

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रावेत , किवळे प्रभाग क्रमांक १६ मधील पाणीपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवावी, अन्यथा १ नोव्हेंबर २०२६ रोजी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी दिला आहे. रावेत येथील सर्वे क्रमांक ९६ मधील पंपिंग स्टेशनवर वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरही पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक क्षमतेचा जनरेटर तातडीने खरेदी करून बसवावा, अशी मागणी त्यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा व विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. रावेत पंपिंग स्टेशनवर पाणीपुरवठ्यासाठी विविध टाक्या असून, या केंद्रातून प्रभागातील नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर पंपिंग प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी आवश्यक जनरेटरची सुविधा उपलब्ध नसल्याने पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याचे तरस यांनी निवेदनात नमूद केले आहे. परिणामी, हजारो नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. पाणी ही नागरिकांची अत्यावश्यक मूलभूत गरज आहे. केवळ वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागणे ही गंभीर बाब आहे. यापूर्वीही पाणीपुरवठ्याच्या समस्यांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे या प्रश्नावर तात्पुरत्या उपायांऐवजी कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक असल्याचे ऐश्वर्या तरस यांनी स्पष्ट केले. रावेत पंपिंग स्टेशनवर आवश्यक क्षमतेचा जनरेटर खरेदी करून बसविण्याची कार्यवाही १ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावी. वीजपुरवठा खंडित झाला तरी पाणी उपसा व पंपिंग प्रक्रिया सुरू राहील, अशी व्यवस्था निर्माण करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. या प्रश्नासंदर्भात नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी तसेच विद्युत विभागाचे सह शहर अभियंता श्री. कावळे यांना निवेदन दिले आहे. निर्धारित मुदतीत आवश्यक कार्यवाही न झाल्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांविरोधात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

चिंचवड येथे आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद

पिंपरी : दैनिक संध्या

बौद्ध महिलांचा ऐतिहासिक प्रवास, वर्तमानातील स्थान आणि भविष्यातील वाटचाल यांवर विचारमंथन करण्यासाठी भारतासह श्रीलंका, व्हिएतनाम, कोरिया आणि ऑस्ट्रेलिया येथील बौद्ध भिक्खुणी, विचारवंत, संशोधक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर एका व्यासपीठावर एकत्र येणार आहेत. 'विस्डम इन मोशन फोरम' आणि 'कॅटॅलिस्ट फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद पुणे २०२६' ही परिषद शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात होणार आहे. 'बौद्ध महिलांचा प्रवास : प्रज्ञा, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तन' ही परिषदेची संकल्पना आहे. भगवान बुद्धांच्या भिक्खुणी संघाच्या परंपरेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांनी बौद्ध समाजात घडवलेल्या बदलांपर्यंतचा आढावा घेत महिलांच्या सद्यस्थितीतील प्रश्नांवर आणि पुढील वाटचालीसाठी आवश्यक उपाययोजनांवर परिषदेत चर्चा होणार आहे, अशी माहिती आयोजन समितीच्या अध्यक्षा व प्रसिद्ध भूलरोगतज्ज्ञ डॉ. उज्ज्वला आंदुरकर, बालरोगतज्ज्ञ डॉ. संध्या हरिभक्त, वैद्यकीय नोडल अधिकारी डॉ. वैशाली भामरे आणि पाली व बौद्ध अध्ययनाच्या अभ्यासक लक्ष्मीकांता माने यांनी दिली. परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत आणि दलित स्त्रीवादी अभ्यासक प्रा. डॉ. विमल थोरात यांच्या हस्ते होणार आहे. मिलिंद महाविद्यालयाच्या प्रथम महिला प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान आणि कामगार सहआयुक्त शिरीन संजू लोखंडे या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. परिषदेतील प्रमुख वक्त्यांमध्ये श्रीलंकेतील कोलंबो विद्यापीठाच्या विभागप्रमुख प्रा. मनोरी पी. सेनानायके, मुंबई विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. योजना भगत, ऑस्ट्रेलियातील नवयान बौद्ध चॅरिटेबल ऑर्गनायझेशनच्या संचालिका व शिक्षणतज्ज्ञ डॉ. रुपाली मुन, व्हिएतनामच्या भिक्खुणी व संशोधक भिक्खुणी विसुद्धिपञ्ञा, पुण्यातील मानसशास्त्रज्ञ व विपश्यना शिक्षिका डॉ. नीलम ओसवाल आणि कोरियातील भिक्खुणी व संशोधक भिक्खुणी महाकासा यांचा समावेश आहे. दैनंदिन जीवनातील बौद्ध मूल्ये, शिलालेखांतून उलगडणारा धम्म, परदेशातील आंबेडकरी विचारांची भूमिका, व्हिएतनामी बौद्ध भिक्खुणींचे योगदान, मानसिक ताण-तणावांवर धम्माच्या माध्यमातून मात आणि कोरियन भिक्खुणी संघाचे कार्य अशा विविध विषयांवर हे वक्ते आपले विचार मांडणार आहेत.

सेवा संकल्प अभियानांतर्गत वायसीएम रुग्णालयात रक्तदान शिबिर संपन्न

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि वायसीएम रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. वायसीएम रुग्णालयातील चाणक्य हॉल येथे आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये एकूण १९५ जणांनी नोंदणी केली, त्यापैकी १०४ रक्तदात्यांनी प्रत्यक्ष रक्तदान केले. यामध्ये ८५ पुरुष आणि १९ महिला रक्तदात्यांचा समावेश होता. महापालिकेचे मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले. सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा भवसार आणि नोडल वैद्यकीय अधिकारी डॉ. छाया शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले. रक्तदान हे गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार सुरक्षित रक्त उपलब्ध व्हावे, तसेच नागरिकांमध्ये नियमित रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 'सेवा संकल्प अभियानाच्या' माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर महापालिकेचा भर आहे. या शिबिराच्या यशस्वितेसाठी महापालिकेच्या कुटुंबकल्याण विभागाचे आणि वायसीएम रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाचे विशेष सहकार्य लाभले. रक्तपेढीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नीता तायडे आणि डॉ. हर्षदा बाविस्कर यांनी शिबिराच्या नियोजनात व अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले. संबंधित वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे या उपक्रमासाठी विशेष योगदान लाभले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना रक्तदानासह विविध आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांच्या सक्रिय सहभागातून निरोगी समाजाच्या निर्मितीस हातभार लागेल, असा विश्वास महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

व्यावसायिकांनी विश्लेषणात्मक दृष्टिकोन विकसित करावा : डॉ. धारवाडकर

एसबीपीआयएम मध्ये राष्ट्रीय बिझनेस केस चॅलेंज "मीमांसा" चा समारोप

■ पिंपरी (दै. संध्या)



कॉर्पोरेट विश्वात प्रवेश करण्यापूर्वी तरुण व्यावसायिकांनी विश्लेषणात्मक दृष्टिकोन विकसित करावा. "मीमांसा" या राष्ट्रीय बिझनेस केस चॅलेंज स्टडीज मध्ये विद्यार्थ्यांना एखाद्या समस्येवर योग्य उपाय शोधण्यासाठी सखोल विचार कसा करावा याचे मार्गदर्शक मिळते. प्रत्येक केस स्टडी मध्ये नेहमी का, केव्हा, काय, कुठे, कोणाला हे पाच प्रश्न विचारले पाहिजेत त्यामुळे निरीक्षण शक्ती विकसित होते असे मार्गदर्शन एसबीपीआयएम च्या प्राचार्य डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कॅम्पस मध्ये "मीमांसा २०२६" या राष्ट्रीय स्पर्धेची ऑफलाईन अंतिम फेरी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार करताना डॉ. धारवाडकर बोलत होत्या. यापूर्वी ऑनलाइन पहिल्या फेरीत चार राज्यांमधील १८ संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४८ संघांनी सहभाग घेतला होता. त्या मूल्यमापनानंतर अंतिम फेरीसाठी १२ संघांची निवड करण्यात आली होती. या संघांमध्ये पुणे, बेंगळुरू, धुळे आणि संगमनेर येथील स्पर्धकांचा समावेश होता.

भारत फोर्जचे माजी संचालक डॉ. संतोष भावे, सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स च्या अधिष्ठाता डॉ. प्रतीक्षा वाबळे व उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी अंतिम फेरीचे मूल्यांकन केले. तर अंतर्गत तज्ज्ञ समितीमध्ये एसबीपीआयएम संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, संशोधन विभाग प्रमुख डॉ. भूषण परदेशी यांचा समावेश होता. तसेच यावेळी डॉ. रूपाली कुदरे, डॉ. शिवाजी देसाई, डॉ. अनिशकुमार कारिया, डॉ. काजल महेश्वरी आणि डॉ. संतोष शिंदे, डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन, डॉ. दिलीप पवार आदी उपस्थित होते.

संघांनी प्रकल्प सादर करून विश्लेषणात्मक तर्क व आत्मविश्वासाने तज्ञांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. व्यवस्थापन शिक्षणातील विश्लेषणात्मक विचार आणि समस्या निवारणाच्या व्यावहारिक कौशल्यांचे महत्त्व मांडण्यात आले. तज्ञ समितीने कॉर्पोरेट नेतृत्व, मानव संसाधन, वित्त, विपणन, उच्च शिक्षण आणि व्यवस्थापन या क्षेत्रांतील विविध दृष्टिकोन याचे परीक्षण केले. तसेच 'मार्केटिंग ३६०' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

"मीमांसा २०२६" या स्पर्धेचा निकाल प्रथम क्रमांक :- कनक सांगळे आणि लक्ष धनानी, इंदिरा युनिव्हर्सिटी २० हजार रुपये; द्वितीय क्रमांक :- कृष्णा भवनानी आणि शिवानी ओझा, एसवीकेएम, एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी, धुळे १५ हजार रुपये; तृतीय क्रमांक :- प्रणीत कुलकर्णी आणि मधुरम धनक, ॲमिटी ग्लोबल बिझनेस स्कूल, १० हजार रुपये या विजेत्या संघांना धनादेश, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र पारितोषिक व इतर सर्व सहभागी संघांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजनात डॉ. संजय गायकवाड, डॉ. पद्मलोचन बिसोयी, डॉ. विशाल वाघ, डॉ. इराम अन्सारी यांनी सहभाग घेतला. स्वागत डॉ. कीर्ती धारवाडकर, सूत्रसंचालन विद्यार्थिनी आर्या सरदेशपांडे यांनी केले.

अप्पूघरमध्ये पर्यटकांची सुरक्षा रामभरोसे, महापालिका प्रशासनाकडे कामाची माहितीच नाही..!

■ पिंपरी (दै. संध्या)

भाजपच्या स्थानिक नगरसेवकांसह सर्वांचा विरोध डावलून सत्ताधारी भाजपने निगडी येथील स्वर्गीय इंदिरा गांधी उद्यानातील सात एकरावरील अप्पूघर थेट १५ वर्षांसाठी पुष्पक अम्युजमेंटला भाड्याने दिले आहे. येथील राईडसची सुरक्षा तपासणी ऑडीट, विद्युत सुरक्षेबाबत व इतर आवश्यक सुरक्षा प्रमाणपत्रांची कोणतीही पूर्तता करण्यात आली नसल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांना महापालिका प्रशासनाने दिलेल्या लेखी उत्तरातून ही माहिती समोर आली आहे. काम सुरु करण्याची आणि पूर्ण करण्याची प्रस्तावित कालमर्यादा, सध्याच्या कामाच्या प्रगतीबाबतचीही माहिती महापालिकेकडे उपलब्ध नाही. कोणतीही माहिती नसताना सात एकरवरील अप्पुघर ठेकेदाराला आंदण दिले आहे का, असा संतप्त सवाल नगरसेवक वाघेरे यांनी विचारला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या निगडी येथील स्वर्गीय इंदिरा गांधी उद्यानातील अप्पूघर पुष्पक अम्युजमेंटला सन २००५ मध्ये २१ वर्षांकरिता भाड्याने देण्यात आले होते. त्याची मुदत ३० सप्टेंबर रोजी संपुष्टात आली. या संस्थेकडे ६ लाख ८३ हजार ६६५ रुपयांची थकबाकी आहे. असे असताना या ठेकेदाराने २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये पाण्याचा तुटवडा असल्याने दोन वर्षे वॉटर पार्क बंद ठेवावा लागल्याचा दावा केला. कोरोनामध्ये मार्च २०२० ते डिसेंबर २०२२ पर्यंत अप्पुघर व वॉटर पार्क बंद असल्याने नुकसान झाल्याचे सांगून तीन वर्षांची मुदतवाढ मागितली होती. ठेकेदाराने तीन वर्षांची मुदतवाढ मागितली असताना सत्ताधारी भाजपने मेहरबानी दाखवित थेट १५ वर्षांची मुदतवाढ दिली. याप्रकल्पाबाबत नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका प्रशासनाकडे लेखी उत्तरे मागितली होती.

आरटीओ चलानाच्या नावाखाली २४ लाखांची सायबर लूट

■ आळंदी (दै. संध्या)

आरटीओ चलानाची माहिती तपासण्याच्या बहाण्याने मोबाईलमध्ये बनावट APK फाईल इन्स्टॉल करण्यास सांगून एका ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल २४ लाख ३५ हजार ५८३ रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास करत आळंदी पोलिसांनी झारखंडमधील जामतारा परिसरातून दोन आरोपींना अटक केली आहे. सायबर चोरट्यांनी मोबाईलचा ॲक्सेस मिळवून सुमारे ७० लाख रुपयांची मुदत ठेव (एफडी) मोडल्याची माहितीही समोर आली आहे.

फसवणुकीतील तक्रारदार हे भाजीपाला वाहतूक व्यवसाय करणारे ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर 'आरटीओ चलान' नावाची APK फाईल आली होती. वाहनावरील दंड तपासण्यासाठी त्यांनी ही फाईल मोबाईलमध्ये इन्स्टॉल केली. मात्र, या फाईलच्या माध्यमातून सायबर गुन्हेगारांनी त्यांच्या मोबाईलचा ॲक्सेस मिळवला.

त्यानंतर काही काळाने त्यांच्या बँक खात्यातून पैसे काढले गेल्याचे संदेश मोबाईलवर आले. तपासणी केली असता त्यांच्या खात्यातून तब्बल २४ लाख ३५ हजार ५८३ रुपये वळवण्यात आल्याचे उघड झाले. या फसवणुकीत सुमारे ७० लाख रुपयांची एफडी मोडण्यात आल्याची बाबही समोर आली.

नाना पाटेकर आणि मधु कांबीकर यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन

■ पिंपरी (दै. संध्या)

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवड शहर कला-प्रेमी मंचाच्या वतीने शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड येथील सायन्स पार्कमधील तारांगण सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

कला, साहित्य, नाटक आणि चित्रपट क्षेत्रातील योगदानाची आठवण करून देत या दोन्ही कलाकारांना आदरांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला शहरातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या श्रद्धांजली सभेला पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तसेच पत्रकार व लेखक प्रदीप निफाडकर, लेखक प्रभाकर ओव्हाळ, ज्येष्ठ कलावंत वसंत अवसरीकर आणि ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ हेही सहभागी होणार आहेत. नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयातून मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या प्रभावी अभिनयशैलीने आणि विविधांगी भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला आहे. तर मधु कांबीकर यांनी मराठी चित्रपट, लोककला आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला.

'वायसीएम'मध्ये स्वतंत्र 'सेप्टिक ऑपरेशन थिएटर' तातडीने सुरू करा!

■ पिंपरी (दै. संध्या)

संसर्गजन्य जखमा आणि शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात स्वतंत्र 'सेप्टिक ऑपरेशन थिएटर' तातडीने कार्यान्वित करावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसह कालबद्ध कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ४० लाखांच्या घरात पोहोचली असून, वाढत्या लोकसंख्येसोबत सार्वजनिक आरोग्यसेवेवरील ताणही वाढत आहे. सर्वसामान्य नागरिक, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वायसीएम रुग्णालय हा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे येथील उपचार सुविधा अधिक सक्षम आणि अद्ययावत करणे आवश्यक असल्याचे लांडगे यांनी निवेदनात नमूद केले आहे. निवेदनानुसार, वायसीएम रुग्णालयात संसर्गजन्य जखमा असलेल्या रुग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटरची आवश्यकता आहे. ही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे काही रुग्णांना इतर रुग्णालयांत हलवावे लागते किंवा उपचारांना विलंब होतो. परिणामी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना प्रवासाचा खर्च, आर्थिक भार आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. खासगी रुग्णालयांतील उपचार परवडत नसलेल्या कुटुंबांसाठी ही परिस्थिती विशेषतः अडचणीची ठरत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. संसर्गजन्य जखमा, पूयुक्त किंवा खराब झालेल्या जखमा आणि शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारल्यास वायसीएममध्येच उपचार देणे शक्य होईल. तसेच संसर्ग नियंत्रण आणि इतर रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवता येतील, असे निवेदनात म्हटले आहे. स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटरसाठी आवश्यक जागा, उपकरणे, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि निधीचा तातडीने आढावा घेण्याची मागणी लांडगे यांनी केली आहे.

दिव्यांगांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करू !

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक विचार करून पुढील योग्य कार्यवाही करू, असे आश्वासन आमदार महेश लांडगे यांनी दिले. प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने दिव्यांगांच्या आर्थिक सहाय्य, घरपट्टी सवलत, स्वयंरोजगार आणि सार्वजनिक सुविधांशी संबंधित मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले. यावेळी संघटनेच्या प्रतिनिधींनी दिव्यांगांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

आमदार महेशदादा लांडगे स्पोर्ट्स फाउंडेशन व शिवांजली सखी मंच यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्रोत्सव उत्साहात सुरू आहे. देवीच्या दर्शनासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक भेट देत असून, यानिमित्ताने नागरिक आपल्या समस्या व मागण्यांची निवेदने प्रत्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्याकडे सादर करत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या प्रतिनिधींनी शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिले.

दिव्यांग व्यक्तींना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच दैनंदिन जीवनात समान संधी मिळण्यासाठी महापालिकेच्या स्तरावर आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने केली आहे. प्रलंबित प्रश्नांबाबत महापालिका आयुक्तांना आवश्यक निर्देश देऊन तातडीने सकारात्मक कार्यवाही व्हावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्वतःच्या मालकीच्या घरात राहणाऱ्या पात्र दिव्यांग व्यक्तींना घरदुरुस्ती आणि आवश्यक सुधारणा करण्यासाठी एकरकमी दोन लाख रुपयांचे अनुदान द्यावे, अशी प्रमुख मागणी आहे. घरपट्टीतील ५० टक्के सवलतीसाठी



इंडेक्स-२ उपलब्ध नसलेल्या दिव्यांगांना पर्यायी मालकी कागदपत्रांच्या आधारे लाभ द्यावा. तसेच मालमत्ता नोंदीत 'भोगवटादार' म्हणून नोंद असलेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींनाही ही सवलत मिळावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. सन २०१७ मध्ये साधन-साहित्य खरेदीसाठी दहा हजार रुपयांचे अनुदान मिळालेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींनाही सध्याच्या नियमानुसार एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य द्यावे, असे निवेदनात म्हटले आहे. पूर्वी मिळालेले साहित्य कालांतराने खराब किंवा वापरण्यायोग्य राहिले नसल्याने या लाभार्थ्यांच्या गरजांचा पुन्हा विचार करण्याची आवश्यकता संघटनेने मांडली आहे. दिव्यांग व्यक्तीने दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास दाम्पत्याला मिळणाऱ्या दोन लाख रुपयांच्या अर्थसहाय्य योजनेचा लाभ १ एप्रिल २०१३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. दिव्यांग-अव्यंग विवाहाच्या अर्थसहाय्य योजनेच्या धर्तीवर दोन्ही योजनांमध्ये समानता राखावी, अशी संघटनेची भूमिका आहे. स्वयंरोजगाराच्या प्रश्नावरही निवेदनात भर देण्यात आला आहे. सन २०१२ पूर्वी परवाना मिळालेल्या दिव्यांग स्टॉलधारकांना त्याच ठिकाणी व्यवसाय सुरू ठेवण्यास परवानगी द्यावी. यासंबंधी निवेदनात नमूद केलेल्या आदेशांची महापालिका स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.महापालिकेची उद्याने, बागा आणि मनोरंजन केंद्रांमध्ये दिव्यांगांना सहज प्रवेश व वापर करता यावा, यासाठी रॅम्प, सुगम मार्ग आणि अनुकूल स्वच्छतागृहे उपलब्ध करावीत. महापालिकेच्या सर्व इमारतींचे सुगम्यता परीक्षण अर्थात 'ॲक्सेसिबिलिटी ऑडिट' करून आवश्यकतेनुसार रॅम्प, लिफ्ट आणि इतर सुविधा निर्माण कराव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



जेजुरीत ग्रामदेवता जाणाईदेवीची भुवनेश्वरी रूपात सजावट

जेजुरी : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदैवत व जागृत श्रद्धास्थान असणाऱ्या जानाई देवीची नवरात्र उत्सवानिमित्त चौथ्या माळेला भुवनेश्वरी देवीच्या रूपात पूजा करण्यात आली. जेजुरी ग्रामदैवत जानाई देवी मंदिर ट्रस्ट व पुजारी वर्गाच्या वतीने ही सजावट करण्यात आली.



बाबदेव देवस्थान परिसराच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार

पुरंदर : दैनिक संध्या

पुरंदर व हवेली तालुक्याला जोडणाऱ्या ऐतिहासिक, निसर्गरम्य व महत्त्वपूर्ण बाबदेव घाटातील बाबदेव देवस्थानच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन पुण्यनगरीतील कसबा पेठ मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार हेमंत रासने यांनी केले. आस्करवाडी (ता. पुरंदर) येथील बाबदेव महाराज मंदिराला नवरात्रोत्सवनिमित्त घटस्थापनादिनी आमदार हेमंत रासने यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. लोकप्रिय आमदार हेमंत रासने यांच्या समवेत यावेळी दगडुशेठ गणपती मंदिराचे विश्वस्त ईतेश रासणे , विश्वस्त सौरभ रायकर उपस्थित होते. श्री बाबदेव देवस्थानचे अध्यक्ष संतोष पायगुडे , उपाध्यक्ष लहू येवले, माजी उपाध्यक्ष साहेबराव वाडकर ,खजिनदार तुकाराम मोरे , सचिव धनराज पाटणे, सुमित पायगुडे यांनी सर्व मान्यवरांचे श्रीफळ व शाल देऊन सन्मान केला. यावेळी बाबदेव देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संतोष पायगुडे यांनी बाबदेव महाराज मंदिर व परिसराचा संपूर्ण इतिहास व माहिती आमदार हेमंत रासने,दगडुशेठ गणपती मंदिराचे विश्वस्त ईतेश रासणे , विश्वस्त सौरभ रायकर यांना दिली.

वडगाव कांदळीत मोफत एसटी कार्ड व महा आयडी कार्ड कॅम्प

वडगाव कांदळी: दैनिक संध्या



क्रांतिवीर महिला संघ भोरवाडी, वडगाव कांदळी यांच्या वतीने मोफत एसटी (एनसीएमसी) कार्ड कॅम्प व महा आयडी कार्ड कॅम्प १४व १५ ऑगस्ट २०२६रोजी भोरवाडी, वडगाव कांदळी(ता. जुन्नर) येथे ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी मोफत आयोजित केला होता. या योजनेअंतर्गत बस, ट्रेनने, मेट्रोसाठी सुलभ तसेच रोखविरहित प्रवास सुविधा मिळणार आहेत .यावेळी गावातील लाडकी बहीण योजनेची महाकार्ड अपडेट करून देण्यात आली या कार्यक्रमास अंकिता कृष्णा भोर, सुनीता भोर, नीलम पाचपुते ,योगिता भोर यांनी विशेष परिश्रम घेतले . हा कार्यक्रम वडगाव कांदळी गावच्या सरपंच उल्काताई श्रीकांत पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला .गावातील ६५ वर्षावरील पुरुष, सर्व महिला महाविद्यालय युवती व विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ घेतला. या कॅम्पमध्ये आयोजकांनी लाभार्थ्यांकडून कोणती फी न घेता मोफत सुविधा देण्यात आली या मोफत कॅम्पचा वडगाव कांदळीतील १०२३ नागरिकांनी सहभाग नोंदविला. मोफत कॅम्पमुळे आयोजकांचे ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे. या कार्यक्रमाच्या वेळी कॅम्पला पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या कल्पनाताई काळे, सरपंच उल्काताई पाचपुते, उपसरपंच संजय खेडकर, माजी सरपंच रामदास पवार, माजी उपसरपंच शरद पाचपुते, बिरोबा ट्रस्टचे अध्यक्ष बी.बी .लांडगे, दूध संस्थेचे चेअरमन संदेश पाचपुते , बबन पाचपुते, संदीपशेठ पाचपुते, अमोल पाचपुते ,रोहन पाचपुते, माऊली निलख,पाटीलबुवा भोर, भास्कर भोर ,संतोष भोर ,साहिल भोर ,गोरक्ष मुटके, प्रकाश थोरात,उमर पठाण, सुभाष लांडगे,मन्सूर पठाण ,बाळासाहेब पाचपुते पाटील, रंगनाथ पाचपुते, सुवर्णा मुटके ,संगीता भोर ,मनीषा पवार ,पूजा भोर , जिजाभाऊ भोर, संदीप निलख,पोपट भोर, महेश भोर, महेंद्र सोनवणे,देविदास भोर, बाजीराव भोर इत्यादी उपस्थित होते. "वडगाव कांदळी येथे क्रांतिवीर महिला मंडळ यांच्या सहयोगातून १४ व १५ ऑगस्ट २०२६रोजी महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत एसटी कार्ड चे वाटप करण्यात आले .विशेषता लाभार्थ्यांकडून कोणतेही पैसे न घेता हा उपक्रम राबविण्यात आला. गावातील १०२३ नागरिकांनी यात सहभाग नोंदविला यापुढेही असे समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा."



कवठे यमाई येथे कर्करोग तपासणी शिबिर; १३२ रुग्णांची तपासणी

मोबाईल व्हॅनमधून स्त्रीरोग व दंतरोग तज्ज्ञांकडून तपासणी; प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सहकार्य

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कर्करोग तपासणी शिबिराचे दि. १३ ला आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी आलेल्या मोबाईल व्हॅनमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. दिनकर सरोदे आणि दंतरोग तज्ज्ञ डॉ. सचिन पवार यांनी एकूण १३२ रुग्णांची तपासणी केली.शिबिरात महिलांची स्त्रीरोगविषयक तपासणी तसेच नागरिकांची दात व तोंडाच्या आरोग्याशी संबंधित तपासणी करण्यात आली.

कर्करोगाची प्राथमिक लक्षणे, त्यापासून बचावाच्या उपाययोजना, नियमित तपासणीचे महत्त्व आणि आवश्यक उपचार याबाबत रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले.

मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्याने रुग्णांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

तपासणीदरम्यान संशयित लक्षणे आढळलेल्या रुग्णांना पुढील तपासणी व उपचारांसाठी आवश्यक सल्ला देण्यात आला.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, कवठे यमाई येथील अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले. रुग्णांची नोंदणी, तपासणीची व्यवस्था, मार्गदर्शन आणि शिबिरातील इतर कामकाजात आरोग्य कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

कर्करोगाचे लवकर निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावीपणे करता येतात. त्यामुळे नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी आणि कोणतीही संशयास्पद लक्षणे आढळल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले. असंसर्गजन्य रोग कार्यक्रमांतर्गत डॉ. दिनकर सरोदे सर स्त्री रोग तज्ञ डॉ. सचिन पवार सर दंत रोग तज्ञ यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र कवठे यमाई येथे कर्करोग तपासणी शिबिरासाठी आलेल्या मोबाईल व्हॅन मध्ये एकूण 132 रुग्णांची तपासणी केली. वरील कॅम्प साठी प्राथमिक आरोग्य कवठे यमाई येथील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकारी सहकार्य लाभले.

कवठे येमाईत दुष्काळी पंचनाम्यांना वेग ! दहा दिवसांत ३०० शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे

दुष्काळी निधी मिळवून देण्यासाठी महसूल प्रशासनाची तत्परता



■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई,मुंजाळवाडी,इचकेवाडी परिसरात पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असताना, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय दुष्काळी मदत मिळावी यासाठी महसूल प्रशासनाकडून पीक पंचनाम्यांच्या कामाला वेग देण्यात आला आहे. मागील दहा दिवसांत प्रत्यक्ष शेतावर जाऊन पिकांची पाहणी व छायाचित्रे घेऊन सुमारे ३०० शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्यात आले असल्याची माहिती ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव यांनी दिली.

शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के यांनी अधिकाधिक दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.या पार्श्वभूमीवर महसूल यंत्रणा कार्यरत असून,नुकसान झालेल्या प्रत्येक पात्र शेतकऱ्याला शासनाच्या नियमानुसार मदत मिळावी,यासाठी पंचनाम्यांची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ग्राम महसूल अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी शलाका अशोक भालेराव यांच्याकडे कवठे येमाई, इचकेवाडी आणि गुंजाळवाडी या तीन गावांचा कार्यभार आहे.दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांकडून पंचनामे व मदतीसंदर्भातील कामांसाठी तलाठी कार्यालयात दररोज गर्दी होत आहे.या कामी लव्हाजी सांडभोर,पोलिस पाटील गणेश पवार हे महत्त्वपूर्ण सहकार्य करीत आहेत. प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करणे, पिकांच्या नुकसानीची छायाचित्रे घेणे आणि पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण करणे, यासाठी महसूल यंत्रणेकडून प्रयत्न सुरू आहेत.शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे जमा करावीत तसेच सर्वांनी पीक पाहणी करून घ्यावी असे आवाहन ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव यांनी केले आहे.

दुष्कामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी पीक पंचनामे व शासकीय मदतीसाठी आवश्यक असलेली योग्य कागदपत्रे आणि अर्ज तलाठी कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन ग्राम महसूल अधिकारी शलाका अशोक भालेराव यांनी केले आहे.पावसा अभावी आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे वेळेत पूर्ण करून त्यांना नियमानुसार दुष्काळी मदत मिळावी,अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

शिरूरमधील स्वस्त धान्य दुकानदारांचा संताप

■ नारायणगाव(दै. संध्या)

कवठे येमाई दि. १४ (प्रतिनिधी) - शिरूर शहर व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे गेल्या तीन महिन्यांपासूनचे मार्जिन मनी अद्याप बँक खात्यांमध्ये जमा झाले नसल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शासनाकडून मिळणारी देय रक्कम प्रलंबित राहिल्यामुळे दुकानदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, सणासुदीच्या काळात त्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत.त्यामुळे ऐन सणासुदीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात स्वात धान्य बंद करण्याचा इशारा शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांनी दिला आहे. स्वस्त धान्य वितरणाची जबाबदारी पार पाडताना दुकानदारांना विविध आर्थिक खर्चांचा भार सहन करावा लागतो. मात्र, सलग तीन महिन्यांचे मार्जिन मनी थकल्याने दैनंदिन व्यवहार आणि आर्थिक नियोजन कोलमडत असल्याची भावना दुकानदारांकडून व्यक्त होत आहे. शासनाकडून देय असलेली रक्कम वेळेत मिळत नसेल, तर दुकानदारांनी आपला व्यवसाय कसा चालवायचा, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश माधवराव रत्नपारखी यांनी पुणे जिल्ह्याच्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. शिरूर शहर व तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांचे गेल्या तीन महिन्यांपासूनचे प्रलंबित मार्जिन मनी तातडीने त्यांच्या



बँक खात्यांमध्ये जमा करावे, अशी ठाम भूमिका संघटनेने मांडली आहे.

'मार्जिन मनी तातडीने जमा करा, अन्यथा धान्य वितरण बंद करण्याची वेळ येईल!'

प्रलंबित मार्जिन मनी त्वरित जमा न झाल्यास नाइलाजास्तव शिरूर शहर व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वितरण बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागेल, असा स्पष्ट इशाराही संघटनेने दिला आहे. त्यामुळे संबंधित पुरवठा विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे. आता जिल्हा पुरवठा विभाग या मागणीची कितपत तातडीने दखल घेतो आणि दुकानदारांच्या खात्यांमध्ये प्रलंबित रक्कम कधी जमा होते, याकडे शिरूर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे लक्ष लागले आहे, असे गणेश माधवराव रत्नपारखी यांनी सांगितले.

माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरीब कुटुंबांना मोफत कपड्याचे वाटप

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड तालुक्यातील दुर्गम भागातील कुडे बुद्रुक येथील गरीब कुटुंबांना माऊली सेवा प्रतिष्ठान, माध्यमातून मोफत कपडे वाटपाचा उपक्रम नुकतेच राबविण्यात आला.

उपक्रमास जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा पुणे नाशिक महामार्गाचे समन्वयक आणि कुडे बुद्रुक गावचे सुपुत्र दिलीपरावजी मेदगे यांचे सहकार्य लाभले. माऊली सेवा प्रतिष्ठान तालुक्यातील गरीब गरजू निराधार कुटुंबातील नागरिकांना मदतीचा हात देण्याचे कार्य गेली अनेक वर्षांपासून करीत आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोफत कपडे, किराणा किट, आर्थिक मदत,निराधार व्यक्तींना राहण्याची सोय,वैफल्यग्रस्त नागरिकांना औषधोपचार असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर माऊली प्रतिष्ठान चे संस्थापक कैलास दुधाळे यांनी वापरण्यायोग्य संकलित केलेले कपड्याची वर्गवारी करून लहानग्या पासून वयोवृधपर्यंत सुमारे ३०पोती कपडे माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील पश्चिम भागातील ठाकरवाडी येथील गरीब कुटुंबांना वाटप करून मदत करण्यात आली. या उपक्रमाला येथील नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला असून आर्थिक मंदीत कपडे मिळाल्याचा आनंद येथील नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

आपल्या सर्वांचे अनमोल सहकार्य आहेत असेच सहकार्य इथून पुढच्या काळामध्ये आपण सर्वांनी ठेवावे हीच अपेक्षा व्यक्त करतो.असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे यांनी आभार व्यक्त करताना सांगितले .

यावेळी प्रगती फ्लेक्सचे मालक वासुदेव गोपाळे कडूस गावचे माजी ग्रामपंचायत सदस्य निवेदक चांगदेव ढमाले निवेदक व ॲडव्होकेट संदीप देशमुख,बाबाजी कातोरे, दिलीप राक्षे,सविताताई लोंढे तसेच. कुडे बुद्रुक येथील अनेक ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते .

श्रीक्षेत्र तुळापूर येथे 'सरसेनापती शौर्य दिन' उत्साहात साजरा

विद्यालयासाठी पाच लाख रुपयांच्या निधीची घोषणा

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

श्रीक्षेत्र तुळापूर येथे 'जय शिवराय प्रतिष्ठान' संचलित धर्मवीर संभाजीराजे माध्यमिक विद्यालयात भाद्रपद अमावास्येचे औचित्य साधून 'सरसेनापती शौर्य दिन' (सरसेनापती संताजी घोरपडे यांचा सर्जिकल स्ट्राइक) अत्यंत उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून निवृत्त पोलीस महानिरीक्षक बी.जी. शेखर पाटील उपस्थित होते. याप्रसंगी मिलिंद एकबोटे यांच्या हस्ते बी.जी. शेखर पाटील यांना चांदीचे कडे देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या व्याख्यानात बोलताना बी.जी.शेखर पाटील यांनी संताजी घोरपडे यांच्या अतुलनीय पराक्रमाचा, शौर्याचा आणि त्यांनी औरंगजेबाच्या छावणीवर केलेल्या ऐतिहासिक सर्जिकल स्ट्राइकचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला. या कार्यक्रमात नवजीवन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लाठीकाठी, तलवारबाजी व मर्दानी खेळांचे प्रदर्शन दाखविले. कार्यक्रमाच्या




आभार प्रदर्शनप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक आबा जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांना नारळाचे रोप देऊन सन्मानित केले. तसेच त्यांनी विद्यालयाच्या विकासासाठी वर्गखोल्यांची मागणी केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत हवेली तालुक्याचे पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी विद्यालयासाठी ५ लाख रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन दिले. तर मिलिंद एकबोटे यांनी आपल्या परिवाराकडून १ लाख रुपयांचा निधी जाहीर केला.

या कार्यक्रमास डॉ.विद्युलता शेखर पाटील, आरोग्यदूत मंगेश चिवटे, चंद्रकांत गोविंद वारघडे, गुरुदत्त भास्कर शेलके, डॉ. गौरव घोडे, राम गवाडे, काशिनाथ तांबे, सुभाष गायकवाड, श्यामराव दाभाडे, अनुराधा दाभाडे, सरपंच राहुल शिंदे, सरपंच सोमनाथ भोंडवे, माऊली शिवले, ज्ञानेश्वर शिवले, कुमार शिवले, मेजर तुकाराम ढफळ, ज्ञानेश्वर पाटेकर यांच्यासह अनेक मान्यवर, परिसरातील ग्रामस्थ, शिवशंभूभक्त आणि विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा : विभागीय आयुक्त शितल तेली-उगले

■ सोलापूर (दै. संध्या)

डिजिटल क्रॉप सर्वेक्षणाचे काम तातडीने पूर्ण करावे, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा गतीने करावा, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची गती वाढवावी तसेच महसूल व खनिकर्म विभागाने निर्धारित महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अपर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कशेकर, सुशांत बनसोडे, सदाशिव पडदुने, सुमित शिंदे, विजया पांगारकर, जयश्री आव्हाड, सचिन इथापे, उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांच्यासह सर्व तहसीलदार उपस्थित होते.

डिजिटल क्रॉप सर्वेक्षणाचे काम लवकर पूर्ण करावे. या कामाबाबत तक्रारी येणार नाहीत, याची दक्षता घ्यावी तसेच गटनिहाय याद्या पाठवाव्यात, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या. अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. लोकशाही दिनामध्ये जास्तीत जास्त प्रकरणांचा निपटारा



होण्यासाठी तहसीलदारांनी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन काम करावे. नागरिकांना बोलावून त्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी व्यक्तिशः लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेअंतर्गत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पाच याप्रमाणे जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ५५ पाणंद रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता येण्याबाबत यापूर्वीच्या बैठकीत सुचित करण्यात आलेले होते. मात्र, सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत केवळ २६ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे आढाव्यात दिसून आले. त्यामुळे उर्वरित कामांच्या प्रशासकीय मान्यता देण्याची गती वाढवावी, असे निर्देश त्यांनी दिले.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित समित्यांच्या सदस्य सचिवांनी समिती अध्यक्षांना नियमांबाबत योग्य मार्गदर्शन करावे. राज्यस्तरावर या योजनेसाठी एक हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून, अधिकाधिक कामे हाती घेऊन घ्यावी व घेतलेल्या कामापैकी ५० टक्के कामे पूर्ण झाल्यानंतर निधीची मागणी महसूल विभागाकडे करता येणार आहे. जो जिल्हा जास्तीत जास्त निधी मागणी करेल त्यांना निधी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी कामे मंजुरीची व प्रशासकीय मान्यतेची गती वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भूमिअभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे रस्ते मोजणीची आलेली कामे तातडीने पूर्ण करावीत. जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख यांनी तालुकास्तरीय अधिकाऱ्यांवर योग्य नियंत्रण ठेवून कामांचा नियमित आढावा घ्यावा. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पाणंद रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर मार्गी लावण्यासाठी महसूल, भूमिअभिलेख आणि संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. सर्व विभागांमध्ये योग्य समन्वय राहिल्यास योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल, असे त्यांनी नमूद केले. चालू वर्षासाठी महसूल विभागाला १०६ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करावे. तहसीलदारांनी क्लास चेंज अर्थात वर्गबदलाची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर हाताळून महसूल वसुलीला गती द्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. खनिकर्म विभागाला १५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले असून, आतापर्यंत ४१ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. उर्वरित १०९ कोटी रुपयांची वसुली करण्यासाठी विभागाने प्रभावी नियोजन करून उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे, असेही त्यांनी सांगितले. सेवा संकल्प अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्याचे काम चांगले असून, विभागीय स्तरावर प्रथम तर राज्यात पाचवा क्रमांक असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील दोन ते तीन दिवसांत अधिक प्रभावी काम करून राज्यस्तरावर पहिल्या तीन क्रमांकांमध्ये येण्यासाठी सर्व विभागांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करून निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी शेवटी दिले. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी विविध विषयांवरील कामकाजाची माहिती सादर केली. महसूल प्रशासनाला देण्यात आलेली सर्व उद्दिष्टे निर्धारित वेळेत पूर्ण केली जातील. तसेच मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातून जास्तीत जास्त कामे प्रस्तावित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले

थोडक्यात पण महत्वाचे

समान भाषा उपशीर्षकांमुळे भाषा शिक्षणाला गती

मुंबई : दृकश्राव्य माध्यमांमध्ये समान भाषेतील उपशीर्षके (subtitles) उपलब्ध झाल्यामुळे भाषेचे आकलन आणि वाचन वाढण्यास मदत होईल. या उपक्रमामुळे निश्चितच भाषा शिक्षणाला गती येईल, असा विश्वास माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला. वरळी येथील दूरदर्शन केंद्रात प्लॅनेट रीड 'मराठी समान भाषा उपशीर्षक केंद्रा'चा शुभारंभ सिंह यांच्या हस्ते फित कापून करण्यात आला. त्यानंतर दूरदर्शन केंद्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी दूरदर्शन केंद्र मुंबईचे उपसंचालक (अभियांत्रिकी) हेमंत देसाई, गणेश अय्यर आणि आयआयटी दिल्लीचे सहाय्यक प्राध्यापक तथा 'बिलियन रीडर्स'चे प्रमुख प्रा. ब्रिज कोठारी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील मराठी मनोरंजन कार्यक्रमांमध्ये मराठी भाषेतून देवनागरी लिपीत उपशीर्षके (subtitling) देण्यात येणार आहेत. यामुळे कार्यक्रम पाहणाऱ्या प्रत्येकाचे मराठी वाचन होणार आहे. मराठी भाषा वाचनाला यामुळे चालना मिळेल. विद्यार्थी तसेच श्रवणदिव्यांगांना याचा मोठा लाभ होईल. अशा प्रकारे प्रादेशिक भाषेतून उपशीर्षके देण्याच्या या उपक्रमाची सुरुवात सर्वप्रथम महाराष्ट्रातून झाली आहे. या उपक्रमाची सुरुवात राज्य शासन, प्रसार भारती, आयआयटी दिल्ली आणि प्लॅनेट रीड यांच्या वतीने करण्यात आली आहे.

निर्यात संधी उपलब्ध करून देणार

मुंबई : महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्कच्या (मॅग्नेट) २.० या विस्तारित टप्प्यात राज्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक बाजारपेठा, मोठ्या क्षमतेच्या प्रक्रिया सुविधांचे जाळे आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. प्रकल्पाची प्रशासकीय आणि वित्तीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करून आशियाई विकास बँकेकडील पुढील मंजुरीसाठी आवश्यक कार्यवाही गतिमान करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या कामकाजाचा आढावा मंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीत प्रकल्पाची सद्यस्थिती, आतापर्यंतची प्रगती आणि प्रस्तावित मॅग्नेट २.० प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ३३ हजारांहून अधिक फलोत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. काढणीपश्चात पायाभूत सुविधांच्या ६२ उपप्रकल्पांना वित्तसाहाय्य करण्यात आले असून, १५३ शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्यसाखळीतील घटकांना सवलतीच्या व्याजदराने आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच ६७ शेतकरी उत्पादक कंपन्यांना नावीन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय २१ कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या सुविधांचे आधुनिकीकरण आणि राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या तळेगाव येथील सुविधांचे अद्ययावतीकरण करण्यात आले आहे.

मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक आणि प्रभावी पाठपुरावा सुरू

मुंबई : मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक आणि प्रभावी पाठपुरावा सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली या प्रश्नांची सोडवणूक मंत्रिमंडळ उपसमितीमार्फत करण्यात येईल असा विश्वास मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. मुंबईतील सह्याद्री अतिथिगृह येथे मराठा समाजाच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्ण खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व्यवस्थापकीय संचालक अविनाश रणखांब आणि सारथी चे व्यवस्थापकीय संचालक सतीश कुमार खडके उपस्थित होते.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षणचे कामकाज वेळेत पूर्ण करा

वैध मतदान पद्धतीबाबत मतदार जनजागृती करा



■ सांगली (दै. संध्या)

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेंतर्गत सांगली जिल्ह्यातील ९५.८० टक्के मतदार हे अंतिम यादीमध्ये वर्ग करण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून, उर्वरित कामास गती देऊन प्रलंबित कामकाज पूर्ण करावे. संपूर्ण प्रक्रिया निर्धारित वेळेत आणि पारदर्शकपणे पूर्ण करावी. तसेच महाराष्ट्र विधानपरिषद पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत मतदार यादीत नाव शोधणे व योग्य रीतीने मतदान कसे करावे याबाबत अधिकाधिक जनजागृती करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक तथा निवडणूक निर्णय अधिकारी शीतल तेली-उगले यांनी आज येथे दिले.

सांगली जिल्ह्यातील विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेंतर्गत कामकाज तसेच महाराष्ट्र विधानपरिषद पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नीता शिंदे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्याच्या कालावधीत २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ही मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत निश्चित करण्यात आली होती. सुधारित कार्यक्रमानुसार दावे व हरकती दाखल करण्याची प्रक्रिया २६ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, प्राप्त दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. या प्रक्रियेतील कामकाजादरम्यान येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून निर्धारित वेळापत्रकापूर्वी आणि अचूकतेने पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या.

विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक शीतल तेली-उगले म्हणाल्या, मतदार यादीच्या शुद्धीकरणाच्या दृष्टीने एसआयआर प्रक्रिया महत्त्वाची असून, या प्रक्रियेत संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. विशेष संक्षिप्त पुनरीक्षणाचे काम प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षकांच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावरील कामकाजावर नियमित देखरेख ठेवावी. तसेच मतदार नोंदींची पडताळणी, मॅपिंग आणि अर्जांचा निपटारा यामध्ये अचूकता राखून निर्धारित वेळेत काम पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO), पर्यवेक्षक तसेच बूथ लेव्हल एजंट (BLA) यांच्या नियुक्त्या आणि पुनरीक्षण प्रक्रियेतील विविध कामांच्या प्रगतीचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

या बैठकीत सांगली जिल्ह्यातील मिरज, सांगली, इस्लामपूर, शिराळा, पलूस-कडेगाव, खानापूर, तासगाव-कवठे महांकाळ आणि जत या आठ विधानसभा मतदारसंघांतील निवडणूकपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत मतदार यादीत नाव कसे शोधायचे तसेच, वैध मतदानाची योग्य पद्धत याविषयी सर्व माध्यमांतून मतदार जनजागृती करावी.

धान्य साठवणुकीचे काटेकोर नियोजन करा : मंत्री जयकुमार रावल

■ मुंबई (दै. संध्या)

केंद्र शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये सोयाबीन, मूग, उडीद व तूर खरेदीसाठी केंद्रांवर शेतकऱ्यांना आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच खरेदी केलेल्या शेतमालाच्या साठवणुकीचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामातील हमीभाव खरेदीच्या पूर्वनियोजनाबाबत बैठक झाली. खरीप हंगाम २०२६-२७ साठी सोयाबीनच्या हमीभावात ३८०, तुरीच्या हमीभावात ४५०, उडदाच्या हमीभावात ४०० रुपयांची वाढ झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या बैठकीस प्रधान सचिव प्रवीण दराडे, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर, मार्कफेडचे कार्यकारी संचालक अशोक करंजकर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सहसचिव विजय लहाने, कृषी विभागाचे उपसचिव संतोष कराड, नाफेड आणि एनसीसीएफच्या अधिकारी आदी उपस्थित होते.

खरेदी करण्यात येणाऱ्या कडधान्ये व तेलबियांच्या साठवणुकीसाठी वखार महामंडळाच्या स्वमालकीच्या १६८ वखार केंद्रांबरोबरच आवश्यकतेनुसार भाडेतत्वावरील गोदामांचा वापर करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत स्वमालकीच्या व भाडेतत्वावरील गोदामांमध्ये ८.१२ लाख मे. टन रिक्त साठवणूक जागा उपलब्ध आहे. खरीप हंगामासाठी खासगी गोदामांचे नियोजन करून आणखी ७.१६ लाख मे. टन आंतरिक क्षमता उपलब्ध होणार असून, एकूण १५.२८ लाख मे. टन साठवणूक जागा उपलब्ध होईल.

सर्व खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांसाठी बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृह



या मूलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात. किंमत समर्थन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बारदाना, वाहतूक आणि गोदामांची व्यवस्था करावी. तसेच संबंधित राज्यस्तरीय नोडल संस्थांच्या सर्व खरेदी केंद्रांवर क्यूआर कोड टॅगिंगची व्यवस्था करावी, असे निर्देश मंत्री रावल यांनी दिले. नाफेडमार्फत २२ जिल्ह्यांत, तर एनसीसीएफमार्फत सहा जिल्ह्यांत खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई; विदर्भ सहकारी पणन महासंघ, नागपूर आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे या राज्यस्तरीय नोडल संस्था खरेदी प्रक्रियेत सहभागी होतील. राज्य शासनाने निश्चित केलेल्या यादीनुसार खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात येणार आहेत. हमीभाव योजनेची माहिती अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येक खरेदी केंद्रावर माहिती फलक लावण्याबरोबरच दूरचित्रवाणी, आकाशवाणी, प्रसिद्धीपत्रके आणि फलकांच्या माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात येणार आहे. नोंदणी व खरेदी यंत्रणा सुरळीत चालण्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

दिव्यांग पेन्शनसाठी किमान दिव्यांगत्वाची अट आता ४० टक्क्यांवर


साडेत्रेपन्न हजार कोटींच्या सामाजिक सहाय्य कार्यक्रमाला मंजुरी; देशातील ३ कोटी २० लाख लाभार्थ्यांना लाभ

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

दिव्यांग व्यक्तींना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी केंद्र सरकारने दिव्यांग पेन्शनच्या पात्रता निकषांत महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. दिव्यांगत्वाचे किमान आवश्यक प्रमाण ८० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. तसेच, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी सुरू ठेवण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या कार्यक्रमासाठी ५३ हजार ४२८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, देशातील ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे ३.२० कोटी लाभार्थ्यांना याचा लाभ होणार आहे.

राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाचे नामकरण 'प्रधानमंत्री सामाजिक सहायता योजना' असे करण्यात येणार आहे. या अंतर्गत विविध पेन्शन व सामाजिक अर्थसहाय्य योजनांची नावेही बदलण्यात येणार आहेत. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ पेन्शन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेन्शन योजना यांना अनुक्रमे 'प्रधानमंत्री वृद्धावस्था पेंशन योजना', 'प्रधानमंत्री विधवा पेंशन योजना' आणि 'प्रधानमंत्री दिव्यांगजन पेंशन योजना' अशी नावे देण्यात येणार आहेत. तसेच, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचे नामकरण 'प्रधानमंत्री परिवार लाभ योजना' असे करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री दिव्यांगजन पेन्शन योजनेअंतर्गत शून्य ते ७९ वर्षे वयोगटातील पात्र लाभार्थ्यांना दरमहा ३७५ रुपये, तर ८० वर्षे व त्यावरील लाभार्थ्यांना दरमहा ६२५ रुपये अर्थसहाय्य




देण्यात येणार आहे. योजनेच्या पात्रतेसाठी आवश्यक असलेले किमान दिव्यांगत्वाचे प्रमाण ८० टक्क्यांवरून ४० टक्के करण्यात आले आहे. तसेच, पेन्शनसाठीची किमान वयोमर्यादा जन्मापासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पात्र दिव्यांग व्यक्तींना सामाजिक सुरक्षा योजनेच्या कक्षेत आणण्याचा मार्ग अधिक व्यापक होणार आहे.दिव्यांग पेन्शन योजनेतील पात्रता निकष, लाभार्थ्यांची संख्या आणि अर्थसहाय्याच्या रकमेसंदर्भातील सुधारित मार्गदर्शक सूचना पुढील तीन महिन्यांत जारी करण्यात येणार आहेत. त्यानंतर या सुधारणांची अंमलबजावणी केली जाईल. वृद्धापकाळ पेन्शन योजना, विधवा पेन्शन योजना आणि राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना सध्याच्या स्वरूपात सुरू राहणार आहेत.राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाची सुरुवात १५ ऑगस्ट १९९५ रोजी करण्यात आली. गरीब कुटुंबांना सामाजिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. भारतीय संविधानातील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि अनुच्छेद ४१ मधील तरतुदींनुसार केंद्र सरकारची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारकडून १०० टक्के अर्थसहाय्य दिले जाते. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार, दिव्यांग पेन्शनच्या पात्रतेसाठी 'बेंचमार्क दिव्यांगत्वा'चे प्रमाण ४० टक्के निश्चित करण्यात आले आहे. तसेच, इतर समान स्वरूपाच्या योजनांच्या तुलनेत दिव्यांग व्यक्तींना दिले जाणारे अर्थसहाय्य किमान २५ टक्के अधिक असावे, अशी तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पात्रतेचे निकष शिथिल करण्याचा निर्णय दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षा अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्रशासनाकडून अभिवादन

बारामती : दैनिक संध्या

माजी राष्ट्रपती ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी उपविभागीय कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार प्रतिभा शिंदे यांच्यासह कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याप्रकरणी शिक्षकाविरुद्ध पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा

उरुळी कांचन : दैनिक संध्या

सोरतापवाडी (ता. हवेली) हद्दीतील माध्यमिक विद्यालयात अल्पवयीन विद्यार्थिनीशी अयोग्य वर्तन केल्याच्या आरोपावरून एका शिक्षकाविरुद्ध उरुळी कांचन पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकासवर्धन बाबुराव वाघमारे (रा. नायगाव, ता. हवेली, जि. पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. या प्रकरणामुळे शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाळेच्या मैदानावर तसेच स्टाफरूममध्ये बुधवार (ता.७ ऑक्टोबर) रोजी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी आणि मंगळवार (ता.१३ ऑक्टोबर) रोजी दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी संबंधित घटना घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित शिक्षकाने शाळेतील विद्यार्थिनीच्या कमरेवर, पाठीवर, गालावर व हातावर हात फिरवून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७४ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पॉक्सो) कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. यात संबंधित शिक्षकाला पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे ग्रेड पोलीस उपनिरीक्षक बापूसाहेब मत्रे करीत आहेत.



वृत्तपत्र विक्रेते संजय जाधव यांचा पत्रकारांच्या हस्ते सन्मान

दौंड : दैनिक संध्या

जागतिक वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त चौफुला-केडगाव येथील वृत्तपत्र विक्रेते संजय जाधव यांनी गेल्या २५ वर्षांपासून वृत्तपत्र विक्रीचे कार्य निष्ठेने आणि सातत्याने केल्याबद्दल त्यांचा ज्येष्ठ पत्रकारांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार रमेश वत्रे, ज्येष्ठ पत्रकार संजय सोनवणे, पत्रकार दीपक पवार आणि 'प्रभात'चे पत्रकार विठ्ठल थोरात यांच्या हस्ते संजय जाधव यांना फेटा बांधून व शाल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना वृत्तपत्र विक्रेता दिनाच्या शुभेच्छा दिल्या. गेल्या २५ वर्षांपासून ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता वाचकांपर्यंत दररोज वृत्तपत्र पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वृत्तपत्र विक्रेते करत असतात. समाजात घडणाऱ्या विविध घटनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात वृत्तपत्र विक्रेत्यांचे योगदान मोलाचे आहे. संजय जाधव यांनी गेली २५ वर्षे सातत्याने केलेल्या या कार्याचा गौरव करत पत्रकारांनी त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. या सन्मानामुळे संजय जाधव यांना प्रोत्साहन मिळाले असून, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कार्याचा सन्मान होणे ही अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आळेफाटा येथे जनजागृती



नारायणगाव : दैनिक संध्या

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आळेफाटा येथे मानसिक आरोग्याविषयी समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी एका विशेष 'मानसिक आरोग्य जनजागृती दिंडी'चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विविध शाळा, महाविद्यालये आणि संस्थांमधील सुमारे ४०० विद्यार्थी, ४५ स्वयंसेवक आणि १२ शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन कुलस्वामी मेडिकल फाउंडेशन संचलित सुमन पुनर्वसन केंद्र, अनंतराव कणसे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, शांती वेलनेस अँड रिहॅब सेंटर आणि जय हिंद कॉलेज ऑफ नर्सिंग, आळेफाटा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या दिंडीमध्ये जय हिंद कॉलेज ऑफ नर्सिंगचे ५० विद्यार्थी आणि दोन शिक्षक प्रामुख्याने सहभागी झाले होते. सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून आणि घोषणा देऊन या दिंडीची सुरुवात झाली. त्यानंतर ही दिंडी येवले अमृततुल्य चौक आणि सावता माळी मंदिर मार्गे पुढे आळेफाटा बसस्थानक परिसरात पोहोचली. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणाऱ्या आणि जनजागृती करणाऱ्या विविध घोषणा देऊन संपूर्ण परिसर दणाणून टाकला होता.जय हिंद कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी 'ऐकावे मनाचे' या विषयावर एक विशेष सादरीकरण केले. या सादरीकरणाच्या माध्यमातून त्यांनी उपस्थितांना मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. मानसिक तणावाच्या काळात एकमेकांशी संवाद साधणे, मनातील भावना समजून घेणे आणि गरज पडल्यास योग्य वेळी तज्ज्ञांची मदत घेणे किती गरजेचे आहे, हा मोलाचा संदेश या उपक्रमातून समाजाला देण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान जनसंपर्क अधिकारी ऋषी साबळे यांनी जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे महत्त्व आणि त्याची आजच्या काळातील गरज स्पष्ट केली. या प्रसंगी जय हिंद कॉलेज ऑफ नर्सिंगचे अध्यक्ष डॉ. प्रदीप गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषिकेश खर्डे,सचिव डॉ. अनुजा गुंजाळ, प्राचार्या प्रा. धनश्री पायगुडे, उपप्राचार्या प्रा. प्राची गावडे आणि समीर पाडेकर आदी मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वच संस्थांच्या प्रतिनिधींनी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

स्वातंत्र्य मूल्य नव्हे; समाजव्यवस्थेचा भाग व्हावे - गिताली वि. म.

रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड व विद्यार्थी साहाय्यक समिती आयोजित नवदुर्गा सन्मान सोहळ्यात नऊ चित्रकारांचा सन्मान



■ पुणे (दै. संध्या)

प्रत्येकाने चांगला माणूस होणे आणि मैत्रभाव जोपासणे महत्त्वाचे आहे. समाजात वावरत असताना स्त्री-पुरुषांची मूल्ये समान असायला हवीत. स्वातंत्र्य हे मूल्य न राहता ते आपल्या समाजव्यवस्थेचा भाग व्हायला हवे, असे प्रतिपादन 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादिका डॉ. गिताली वि. म. यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड व विद्यार्थी साहाय्यक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवदुर्गा या विशेष कार्यक्रमात नऊ महिला चित्रकारांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. गोखलेनगरमधील विद्यार्थी सहाय्यक समितीच्या 'स्व'कलादालन येथे या कलाकारांच्या चित्रांचे प्रदर्शन १५ व १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते रात्री ८ या वेळात आयोजित करण्यात आले आहे, त्याचे आज (१५ ऑक्टोबर) उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उद्योजक प्रतापराव पवार, व्यंगचित्रकार चारुहास पंडित, रोटरी क्लबचे प्रांतपाल नितीन ढमाले, अभिनव कला महाविद्यालयाचे सचिव पुष्कराज पाठक व रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईडच्या अध्यक्षा वैशाली देव उपस्थित होत्या. डॉ. गिताली वि.म म्हणाल्या, समभावाचे मूल्य मानणारी समाजव्यवस्था उभी राहायला हवी. स्त्रियांना सूपर वूमन बनवून त्यांना घर संसारात अडकवून न ठेवता त्यांना मोकळं करा, तिची कला मुक्त होऊ द्या. स्त्री चळवळ ही पुरुष विरोधी नसून स्त्रियांना अन्याय सहन करु नका हे सांगण्यासाठी आहे. लैंगिकता ही एका विशिष्ट गोष्टीपुरती मर्यादित राहता कामा नये, त्याबद्दल उघडपणे बोलले जायला हवे. तसेच समाजातील सर्व पुरुषांनी आपली नजर बदलली तर महिलांना इतर पुरुषांच्या संरक्षणाची गरज भासता कामा नये. यासाठी आपण प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत. गीता भावसार, प्रियांका जगनगडा, पौर्णिमा मोहिते, वैशाली दमकोंडवार, शुभेच्छा वर्तक, साधना कदम, धनश्री लोणकर, अश्विनी पवार व अनिता देशपांडे या महिला चित्रकारांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. प्रदर्शनाच्या कालावधीत शिल्पकार सुप्रिया शिंदे यांचे शिल्पकला प्रात्यक्षिक झाले त्यानंतर सायंकाळी सुकन्या भगत यांचे नवरसावर आधारित नृत्य व सोबत चित्रकार अनिता देशपांडे यांनी नवदुर्गेचे लाईव्ह चित्र साकारले. उद्घाटन कार्यक्रमात चारुहास पंडित यांनी सर्वांचा लाडका चिंटू आणि मिनीचे चित्र काढून उपस्थितांची वाहवा मिळवली. प्रभाकर पाटील यांनी समितीच्या कलादालनाबद्दल व संस्थेच्या कार्याची माहिती दिली व उपस्थितांचे स्वागत केले. शिरीष बोकील यांनी प्रास्ताविकात रोटरी क्लबची हा सन्मान सोहळा आयोजनामागील भूमिका सांगीतली. नितीन ढमाले, व वैशाली देव यांनी रोटरी क्लबच्या कार्याची माहिती दिली. पुष्कराज पाठक म्हणाले, डॉ. अच्युतराव आपटे यांनी समितीचे रोप लावले व त्याचा सुंदर वटवृक्ष तयार झाला. यावेळी ज्येष्ठ चित्रकार सुरेश लोणकर, सुप्रिया शिंदे, राहुल बळवंत, नंदकिशोर चिंचोळकर, ॲड. प्रार्थना सदावर्ते यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता देशपांडे यांनी केले तर आभार मनिषा गोसावी यांनी मानले.

समिती संस्काराचे विद्यापीठ

विद्यार्थी सहाय्यक समिती ही समाजाने समाजासाठी चालवलेली संस्था आहे. समाजाच्या पाठिंब्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा पुण्यासारख्या शहरात येऊन शिक्षण घेण्याचा, राहण्याचा प्रवास सोपा होतो. मात्र हे करत असताना विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण आणि राहण्याची सुविधा दिली जात नाही, तर त्यांच्यात जीवनासाठी आवश्यक मूल्ये व संस्कार रुजवले जातात. खऱ्या अर्थाने समिती संस्काराचे विद्यापीठ आहे. काळानुरुप समितीमध्ये बदल होत असून नुकतीच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शिक्षणावर आधारीत विशेष लॅबची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञांनाचा वापर करुन शिक्षण घ्यावे हाच त्यामागील मुख्य उद्देश आहे.

- प्रतापराव पवार, ज्येष्ठ उद्योजक

नागरिकांचे सत्याग्रह आंदोलन सुरू



■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर नगरपरिषदेच्या आवारातून भंगार साहित्य, घंटा गाड्या व पत्र्यांसह इतर साहित्याची चोरी झाल्याच्या प्रकरणावरून शिरूरमध्ये नागरिकांनी सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे. या प्रकरणातील संशयितांवर कठोर कारवाई करावी, तसेच नगरपरिषदेच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेबाबत जबाबदारी निश्चित करावी, या प्रमुख मागण्यांसाठी शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे मनसेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष महेबुब सय्यद यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

शिरूर नगरपरिषद परिसरातील भंगार साहित्य गायब होण्याचा प्रकार समोर आल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र, या प्रकरणात ठोस कारवाई व्हावी, या मागणीसाठी आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. नगरपरिषदेच्या मालकीचे साहित्य चोरीला जाणे ही गंभीर बाब असून, सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाबाबत प्रशासनाने अधिक दक्ष राहण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

नगरपरिषदेच्या आवारातून जून २०२२ पासून मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य गायब झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामध्ये जस्ताचे पत्रे, पाण्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच इतर भंगार वस्तूंचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. या साहित्याच्या चोरीप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. नगरपरिषदेच्या आवारात पडून असलेल्या साहित्याची योग्य नोंद, साठवणूक आणि देखरेख ठेवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असताना अशा प्रकारे साहित्य गायब होण्याच्या घटनांमुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होत आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये, तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

या सत्याग्रह आंदोलनातून भंगार साहित्य चोरीप्रकरणाची निष्पक्ष चौकशी, संशयितांवर कठोर कारवाई आणि सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करण्याची मागणी करण्यात येत आहे. मागण्यांची दखल घेऊन संबंधित प्रकरणात योग्य ती कार्यवाही व्हावी, यासाठी आंदोलन सुरू ठेवण्यात आले आहे. आंदोलनात विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

जिजामाता विद्यालयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी पंचायत समिती पुरंदरच्या आरोग्य विभागाचा उपक्रम

■ जेजुरी (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे पंचायत समिती पुरंदर आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत इयत्ता पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, बालवयात उद्भवणाऱ्या आजारांचे वेळीच निदान व्हावे आणि आवश्यक उपचार वेळेत मिळावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम हा भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, जन्मापासून ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या आरोग्य संवर्धनावर या कार्यक्रमांतर्गत भर दिला जातो.

जन्मजात व्यंग, बालवयातील विविध आजार, पोषणविषयक कमतरता तसेच विकासातील विलंब आणि दिव्यांगत्व यांचे लवकर निदान करून आवश्यक उपचार उपलब्ध करून देणे, ही या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

बालकांच्या आरोग्यविषयक समस्या वेळेत ओळखून त्यांच्यावर योग्य उपचार करता यावेत, यासाठी शाळा आणि अंगणवाडी स्तरावर आरोग्य तपासणी केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य सुधारण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीही मदत होते. विद्यालयातील या आरोग्य तपासणी उपक्रमाचे मार्गदर्शन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक आणि विद्यालयाच्या आरोग्य विभागप्रमुख सीमा राणे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.



विद्यार्थ्यांचे उत्तम आरोग्य हीच त्यांच्या उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे, या विचारातून जिजामाता विद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्यालाही महत्त्व दिले जाते. शारीरिकदृष्ट्या सुदृढ विद्यार्थीच शैक्षणिक, क्रीडा आणि इतर सहशालेय उपक्रमांमध्ये अधिक उत्साहाने सहभागी होऊ शकतात. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले. शालेय प्रशासन आणि आरोग्य विभाग यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

पंचायत समिती पुरंदरच्या आरोग्य विभागाच्या वतीने डॉ. कीर्ती गोसावी, महादेव राऊत, सीमा खैरे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता आणि परिचारिका यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक तक्रारी जाणून घेऊन आवश्यक तपासणी करण्यात आली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आरोग्यविषयक समस्या आढळणाऱ्या बालकांना पुढील तपासणी, संदर्भ सेवा आणि आवश्यक उपचारांसाठी मार्गदर्शन करण्याची तरतूद आहे. त्यामुळे अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना आरोग्यसेवेचा लाभ मिळण्यास मदत होते.

'ग्रीन सोल्यूशन' व चेक प्रजासत्ताकातील 'रिसर्च सेंटर'मध्ये सामंजस्य करार

आंतरराष्ट्रीय संशोधन व तंत्रज्ञान सहकार्याच्या माध्यमातून मिळणार विकासाला चालना; सागर अहिवळे यांची माहिती

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील ग्रीन सोल्यूशन इंडस्ट्रीज आणि चेक प्रजासत्ताकातील इंटरनॅशनल न्यूरोडिजेनेरेटिव्ह डिसऑर्डर्स रिसर्च सेंटर (आयएनडीआरसी) यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. मुंबईत झालेल्या कार्यक्रमात चेक प्रजासत्ताकाचे उपपंतप्रधान आणि उद्योग व व्यापार मंत्री कॅरिल हॅवलीसेक, तसेच महाराष्ट्राचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय संस्थात्मक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या करारामुळे भारतीय औद्योगिक समूह आणि चेक संशोधन संस्था यांच्यात अनुभवांची देवाणघेवाण सुलभ करणे तसेच वैज्ञानिक, तांत्रिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मूल्य निर्माण करणे शक्य होणार आहे. या उपक्रमात दोन्ही संस्थांशी संबंधित प्रतिनिधींनी कराराचे आदानप्रदान केले. यामध्ये ग्रीन सोल्यूशन इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवळे, 'आयएनडीआरसी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक डॉ. वित दोचकाल, सदस्य प्रा. व्हॅक्लाव स्नाशेल, संचालक क्लारा यांचा समावेश आहे. प्राग येथे मुख्यालय असलेली व २०२१ मध्ये स्थापन झालेली इंटरनॅशनल न्यूरोडिजनरेटिव्ह डिसऑर्डर्स रिसर्च सेंटर ही एक ना-नफा संशोधन संस्था आहे. वैज्ञानिक संशोधन आणि आंतरविद्याशाखीय सहकार्याच्या माध्यमातून अल्झायमर रोगासह मज्जासंस्थेच्या ऱ्हासाशी संबंधित विकारांचे आकलन, त्यांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचार यांमध्ये विकास करणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सामंजस्य करारांतर्गत, ग्रीन सोल्यूशन आणि आयएनडीआरसी सहकार्याच्या विविध संधींचा शोध घेणार आहेत. यामध्ये संयुक्त संशोधन उपक्रम, प्रायोगिक प्रकल्प, तंत्रज्ञान विकास, संबंधित माहिती व तज्ज्ञतेची देवाणघेवाण, तसेच कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा आणि ज्ञानाची देवाणघेवाण करणाऱ्या इतर उपक्रमांचे संयुक्त आयोजन किंवा त्यामध्ये सहभाग यांचा समावेश आहे. उद्योगक्षेत्र, संशोधन आणि नवोपक्रम यांना एकत्र आणून सामायिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहकार्याची नवी दालने खुली करण्याची क्षमता या उपक्रमात आहे. दोन्ही संस्थांची क्षमता आणि तज्ज्ञता एकमेकांना पूरक ठरू शकेल. सहकार्याचा विस्तार होत असताना विशिष्ट कार्यक्रम, जबाबदाऱ्या, अर्थसंकल्प आणि अंमलबजावणीविषयक व्यवस्था स्वतंत्रपणे परस्पर संमतीने निश्चित केल्या जातील, असे सागर अहिवळे यांनी नमूद केले. या कराराबाबत पुढे सांगताना सागर अहिवळे म्हणाले, ज्ञानाची देवाणघेवाण आणि तंत्रज्ञानाधारित उपक्रमांच्या संधी शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांशी संवाद व सहकार्य वाढवण्याच्या दिशेने आम्ही कार्यरत आहोत, हा करार हा त्याचाच एक भाग आहे. अशा सहकार्यामुळे औद्योगिक अनुभव, संस्थात्मक संपर्कजाळे आणि वैज्ञानिक तज्ज्ञता यांचा दोन्ही संस्थांना चांगला उपयोग होऊ शकतो. यामध्ये दोन्ही संस्थांना संमत असलेल्या आणि अर्थपूर्ण अशा कार्यक्रमांवर भर देण्यात येईल.

पुढील टप्प्यात प्राधान्यक्रमाची क्षेत्रे निश्चित करणे, व्यवहार्य संधींचे मूल्यमापन करणे आणि दोन्ही संस्थांची उद्दिष्टे व क्षमता यांच्याशी सुसंगत असे उपक्रम परस्पर संमतीने विकसित करणे यावर भर दिला जाईल. त्यामुळे, हा सामंजस्य करार भारत-चेक प्रजासत्ताक यांच्यातील संस्थात्मक सहकार्याच्या नव्या संधी खुल्या करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरेल.

